# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### परभणी जिल्ह्यात कृषी विभागाचे उपविभागीय कार्यालय सुरू करणे बाबत

**(१) ३४१३८ (०७-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात कृषी विभागाचे उपविभागीय कार्यालय सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधीन असून याबाबतचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय कार्यलायाचा प्रस्ताव प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विभागाचे उपविभागीय कार्यालय सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४)) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०४-०७-२०२३) :** (१) होय

(२) व (३) कृषि विभागाचा सुधारीत आकृतिबंध अद्याप अंतिम झाला नसल्यामूळे परभणी जिल्ह्यात कृषि विभागाचे उपविभागीय कार्यालय सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### भिवंडी शहरामध्ये उर्दू घर स्थापन करणेबाबत

**(२) ३४९५० (१२-०१-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी, निजामपूर शहराच्या पंधरा लाख लोकसंख्या असलेल्या एकुण ५६ टक्के मुस्लीम समाजाची मातृभाषा उर्दू असून ७० हून तेथे अधिक प्राथमिक शाळा उपलब्ध असून खाजगी संस्थांद्वारे ३० माध्यमिक शाळा उपलब्ध आहेत, तसेच ७ उच्च माध्यमिक आणि महापदवी विद्यालय उपलब्ध आहेत. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी शहराकरिता उर्दू घर स्थापन करण्याबाबत स्थानिक लोकप्रितिनिधींनी दिनांक २६ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास मा. मंत्री अल्पसंख्यांक विकास यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीत काय आढळून आले वा त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०६-२०२३) :** (१) अशंत: खरे आहे. शालेय शिक्षण विभागाने सादर केलेल्या माहितीनुसार सन २०११ च्या जनगणनेनुसार भिवंडी शहराची लोकसंख्या ७,०९,६६५ इतकी असून भिवंडी शहरात १४५ प्राथमिक शाळा, २३ माध्यमिक व १५ उच्च माध्यमिक आणि महापदवी विद्यालय आहेत.

(२) होय.

(३) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग दि.०६.०५.२०२२ मधील तरतूदीनुसार प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुखोई ३० या लढाऊ विमान दुर्घटनेत बाधित झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत**

**(३) ३५०५५ (१२-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वावी व गोरठान (ता. निफाड, जि.नाशिक) या गावाच्या शिवेवर माहे जून २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सुखोई ३० या लढाऊ विमान दुर्घटना होऊन या दुर्घटनेत येथील अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दुर्घटनेमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी संबधित प्रशासनाबरोबर दि १८ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास बैठक घेऊन नुकसान भरपाई देणेचे आदेश एचएएल प्रशासनास दिले असून देखील अद्यापपावेतो शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही हे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-०६-२०२३) :** (१) सुखोई ३० या लढाऊ विमान दुर्घटना होऊन या दुर्घटनेत ७ शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे.
(२) विमानाचे दुर्घटनेत एकूण ७ शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे एम.एस. न्यू इंडिया इन्शुरन्स कॉ. लिमिटेड या विमा कंपनीमार्फत बाधित शेतकऱ्यांना रक्कम रु. ८ लाख ७७ हजार देण्याचे आश्वासित केले होते. परंतु बाधीत शेतकऱ्यांना ते मान्य नसल्याने जिल्हा प्रशासनामार्फत सदरचे दुर्घटनेबाबत संबंधित प्रशासकीय अधिकारी यांच्या समन्वयाने सदर नुकसानीपोटी देय रक्कम ८ लाख ७७ हजार वरून १३ लाख ८ हजार इतकी रक्कम देण्याबाबत मान्य केले आहे.

सदर भरपाईची रक्कम शेतकऱ्यांना देणेकामी बाधीत शेतकऱ्यांना एच.ए.एल. प्रशासनामार्फत पत्र देऊन बाधित शेतकऱ्यांचे बँक खाते क्रमांकाची मागणी केली. परंतु सदर शेतकऱ्यांनी बँक खाते क्रमांक दिले नाहीत. त्यामुळे एच.ए.एल. प्रशासनामार्फत पुन्हा पत्र देऊन बाधीत शेतकरी यांनी बँक खाते क्रमांक द्यावे अशी मागणी केली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक मार्फत देखील सदरची रक्कम प्राप्त करून घेणेबाबत बाधीत शेतकऱ्यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) प्रस्तुत दुर्घटनेच्या अनुषंगाने व मा. पालकमंत्री तसेच लोकप्रतिनिधी यांच्या सूचनान्वये जिल्हा प्रशासनाने हिंदूस्तान एरोनॉटिक्स लि. यांचेशी वेळोवेळी बैठका आयोजित करून तसेच पत्र व्यवहार करून बाधित शेतकऱ्यांना वाढीव नुकसान भरपाईची रक्कम मिळणेकरिता कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील झाडे झाड्या,झाडे कुणबी, झाड्या ,झाडे कापू ई.झाडे समुहातील जातींच्या लोकाना एन.टी.मधील "सी" चे जात प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

**(४) ४१७८१ (२८-०३-२०२२). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील झाडे झाड्या,झाडे कुणबी, झाड्या ,झाडे कापू ई.झाडे समुहातील जातींच्या लोकांना एन.टी. मधील "सी" चे जात प्रमाणपत्र मिळणेबाबत मंत्री इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती हे खरे आहे काय,

(२) असल्यास ,उक्त बैठकीमध्ये प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांनी भटक्या जमाती क अंतर्गत ‘’झाडे’’ या उप जमातीची नोंद असल्याचे सांगितले असून देखील अनुसुचित जमातीचे जातीचे प्रमाणपत्र देण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदरहू बाब राज्य मागासवर्ग आयोगामार्फत तपासून त्यांच्या अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आश्वासन शासनाने देऊनही अद्यापर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याने झाडे समुहातील जातीमध्ये असंतोष निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, झाडे या समुहातील जातीना एन.टी. मधील “सी” चे जात प्रमाणपत्र देण्याबाबत व समाजाला आरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१९-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) ते (४) भटक्या जमाती “क”अंतर्गत झाडे या उप जमातीची नोंद आहे. तसेच झाडे कुणबी, झाडया, झाडे कोकू या उपजमातीची नोंद भटक्या जमाती “क” प्रवर्गामध्ये नाही. झाडे कुणबी, झाडया, झाडे कोकू या उप जमातीच्या संदर्भात तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगास कळविण्यात आले असून आयोगाचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

---

**अकोला जिल्हयातील एक विद्यार्थी एक वृक्ष लागवड व संवर्धन हा पॅटर्न राज्यात राबविण्याबाबत.**

**(५) ४२९९६ (१८-०४-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयात भारत वृक्षक्रांती मिशनने एक विद्यार्थी एक वृक्ष लागवड व संवर्धन ही संकल्पना राबवून केलेल्या वृक्षलागवडीचे चांगले परिणाम दिसून आले असल्याचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ?

(२) असल्यास, शासनाने ही संकल्पना स्विकारुन वृक्ष लागवडीचा हा अकोला पॅटर्न राज्यातील इतर जिल्हयांत राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०२३) :**(१) व (२) अकोला पॅटर्न हा उपक्रम यशस्वी झाल्याचे आढळून आले असून राज्यात सदर उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सूचना सर्व शिक्षणाधिकारी यांना शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.२४.०१.२०२३ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

तसेच सामाजिक वनीकरण विभागाकडून आवश्यकतेनुसार रोपे पुरविण्याची कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील वडाळा येथील बॉम्बे पोर्ट ट्रस्टला लागून असलेल्या मिठागरांवर डेब्रीज टाकण्यात आल्याबाबत**

**(६) ४४६८१ (०३-११-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वडाळा जवळ माहूलगांव येथील बी.पी.टी.रस्त्याला लागून असलेल्या मिठागराच्या जमिनीवर डेब्रीज टाकून भराव वाढवत नेऊन त्याठिकाणी झोपड्या उभारण्यात येत असल्याप्रकरणी वॉचडॉक फौंडेशन तसेच बॉम्बे ईस्ट इंडियन असोसिएशन या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रार निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त अनाधिकृत भरावामुळे पर्यावरणाचा वाढता धोका विचारात घेता, शासनाने संबंधित अतिक्रमित क्षेत्राची स्थळ पाहणी करुन दोषींविरुद्ध कारवाई करणे आवश्यक असतानासुद्धा सदर प्रकरणी संस्थेने दाखल केलेल्या तक्रारीवर वडाळा पोलीस ठाणे, मुंबई शहर जिल्हाधिकारी आणि मुंबई महापालिका यांच्या तर्फे कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनाधिकृत भरावाच्या वाढीमुळे माहूल गावातील किनारपट्टी क्षेत्र १४६.१६ मिटरने कमी होणे तसेच वातावरणातील बदलामुळे समुद्राची पातळी वाढून किनारपट्टीवरील शहरांना वाढता धोका असताना मुंबईतील नैसर्गिक पानथळ जागा, मिठागरे आदि मुंबईतील पुरस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी इ. चे संवर्धन व संरक्षण करण्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) उपजिल्हाधिकारी (अति.निष्का.), धारावी विभाग, मुंबई शहर यांनी मुंबईतील वडाळा जवळ माहुलगाव येथील बी. पी. टी. रस्त्याला लागुन असलेल्या मिठागराच्या जमीनीवर डेब्रीज टाकून भराव वाढवत नेऊन त्या ठिकाणी होत असलेल्या झोपड्या या महाराष्ट्र शासनाच्या जमिनींवरील नसून केंद्र सरकार, नमक आयुक्त, मिठागरे यांचे कार्यक्षेत्रातील असल्याचे कळविले आहे.

सदर जागेची स्थळपाहणी करणेत आली असता, सदरहू जागा सॉल्ट पॅन महसूल विभागातील भू.क्र.२/१४५ या मिळकतीवरील असून जागेवर अंदाजे ९०० चौ.मी. क्षेत्रावर दगड, माती, रॅबीट चे ढिग आहे. सदर जागा पाणथळ क्षेत्राजवळ असून कार्यालयीन अभिलेखानुसार सदरची जागा Salt Dept. चे नावे दि.०१.०८.१९९७ रोजी हस्तांतरीत करण्यात आली आहे. तसेच, जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दि.१४.१२.२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रश्नांकीत बाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाही करणेबाबत केंद्र सरकार, नमक आयुक्त, मिठागरे यांना कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोणार ( जि.बुलढाणा) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेखाली बोगस लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर केल्याबाबत

**(७) ४५९२३ (०१-११-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणार ( जि.बुलढाणा) तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष तथा सदस्य यांना विचारात न घेता तहसिलदार सैफन नदाफ यांनी २६७ बोगस लाभार्थ्यांची प्रकरणे मंजूर केल्याप्रकरणी मा.महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तसेच मा.जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे चौकशी करण्याची मागणी माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान स्थानिकांनी केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०६-२०२३) : (**१) व (२) अशा आशयाची तक्रार जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे मे २०२२ मध्ये प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी बुलढाणा यांनी उपविभागीय अधिकारी, मेहकर यांना दिले होते. दरम्यानच्या कालावधीत दिनांक १३.०६.२०२२ रोजीच्या संजय गांधी योजना समितीच्या सभेमध्ये सदर २६७ प्रकरणांना मंजुरी देण्यात आली. त्यानुषंगाने सदर बाबतीत तक्रार राहिली नसल्याचे विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अहवालात कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई, नवी मुंबई, पुणे जिल्ह्यात शाखा असलेल्या श्री कुलस्वामीनी को.ऑप.क्रेडीट सोसायटी पतसंस्थेच्या कार्यकारी संचालकाने केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराबाबत**

**(८) ४८४०८ (०६-१०-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, नवी मुंबई, पुणे जिल्ह्यासह मोठ्या प्रमाणात शाखा विस्तार झालेल्या श्री कुलस्वामीनी को.ऑप. क्रेडीट सोसायटी या पतसंस्थेच्या कार्यकारी समितीच्या संचालकाने नवी वाहन विक्री, काळाचौकी येथे बांधकाम व नुतनीकरण, मुलांच्या नावावर जागा खरेदी करणे, बक्षिस समारंभांवर कोट्यावधी रुपये खर्च करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे हे, खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ठाणे जिल्हा सहकार उपनिबंधकांनी केलेल्या तपासणीत आर्थिक नुकसानीचा अहवाल आयुक्त, सहकार विभाग यांना सादर करण्यात येऊन सहकार आयुक्तांनी पतसंस्थेची २१ मुद्द्यावर कलम ८३ अन्वये चौकशी प्रस्तावित करुन त्यास सहा महिने इतका कालावधी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू उच्चस्तरीय चौकशीचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यानुसार संस्थेचे संबंधित दोषी पदाधिकारी, संचालक, ऑडीटर यांचेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०७-२०२३) :** (१),(२) व (३) अंशत: खरे आहे.

पतसंस्थेतील गैरव्यवहाराबाबत सभासदांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने अधिनियमाच्या कलम ८९ (१) अन्वये संस्थेची दिनांक ०१.०४.२०१५ ते ३१.०३.२०२० या कालावधीतील कामकाजाबाबतची तपासणी करण्याचे आदेश सहकार आयुक्तांनी दिले. सदर अहवालामध्ये संस्थेच्या १० शाखांमधील कर्ज प्रकरणे, शाखा/ कार्यालये खरेदीमधील गैरव्यवहार, संस्थेच्या सर्व शाखांच्या नुतनीकरणातील खर्च,जागा खरेदी,काळाचौकी बांधकाम व नुतनीकरणावरील खर्च इ. मुद्दयांबाबत गैरव्यवहार झाल्याचे नमूद केले आहे.

उपरोक्त अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने सहकार आयुक्तांनी संस्थेस झालेल्या आर्थीक नुकसानीबाबत चौकशी करण्यासाठी अधिनियमाच्या कलम ८३ अन्वये तत्कालीन उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे शहर यांची दिनांक १४.०१.२०२२ रोजीच्या आदेशाने नियुक्ती केली.

सहकार आयुक्तांच्या उपरोक्त आदेशाविरुध्द संबंधीतांनी मा.मंत्री (सहकार) यांचेकडे पुनरीक्षण अर्ज दाखल केला होता. त्यानुसार मा.मंत्री (सहकार) यांनी त्यांच्या दि.०३.०३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये सहकार आयुक्तांचे उपरोक्त आदेश रद्द केले असून सर्व थकबाकीदरांवर कायदेशीर कारवाई करून थकीत कर्जाची वसूली करण्याचे आदेश संचालक मंडळाला दिले आहेत.

दरम्यान अधिनियमाच्या कलम ८९ (१) अन्वये सादर केलेल्या अहवालातील अभिप्रायानुसार संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, श्री पिंगळे,उपाध्यक्ष, श्री संतोष चव्हाण व संचालक श्री शदर सोनावणे यांचेविरुध्द सहकार आयुक्तांनी कलम ७३ (क) (अ) अन्वये अपात्रतेची नोटीस बजावली होती. सदर नोटीशीविरुध्द संबंधीतांनी मा.मंत्री (सहकार) यांचेकडे पूनरीक्षण अर्ज दाखल केला असून मा.मंत्री (सहकार) यांनी त्यांच्या दि.०३.०३.२०२३ रोजीच्या आदेशान्वये संस्थेचे अध्यक्ष श्री पिंगळे यांचे म्हणणे ऐकून घेऊन अंतीम निर्णय घेण्याचे आदेश सहकार आयुक्तांना दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माझगांव, मुंबई येथील सीएस क्र.३०९ भूखंडावरील अहमद बिल्डिंगसह को.ऑप.हौ.सोसायटी या संस्थेला हस्तांतरीत करण्यासंदर्भात**

**(९) ४९८८५ (२०-०१-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव, म्हातारपाखाडी येथील सीएस क्र. ३०९ व इमारत क्र.३६-४० अहमद बिल्डिंगसह येथील

को.ऑप.हौ. सोसायटी या संस्थेला हस्तांतरीत करण्यासंदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर मालमत्तेचे बोगस मालक आणि संस्थेचे प्रतिनीधी यांची मागील दोन वर्षापासून सुरु असलेली सुनावणीची कार्यवाही अद्यापही प्रलंबित असल्याचे दिनांक १० आक्टोंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२० या कालावधीपासून ते अद्याप पर्यंत ७ तारखांना सुनावणी घेण्यात येऊनही जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी यांवर निर्णय देऊन प्रस्ताव शासन मान्यतेसाठी शासनाकडे न पाठविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने योग्य निर्देश देऊन उक्त प्रकरणाची विनाविलंब कार्यवाही पूर्ण करण्यास कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०६-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही,

भाडेपट्टाधाकारांचे वारसांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील प्रोबेट सादर केले असून सदर मिळकतीचे भाडेपट्टा नुतनीकरण व मिळकत पत्रिकेवर कब्जेदार यांचे नावे लावण्यास विनंती केली आहे. सदरचे प्रकरण अर्धन्यायीक असल्याने सर्व संबंधीतास दि.२२/०४/२०२२, दि.२३/०५/२०२२, दि.२४/०६/२०२२, दि.१५/०७/२०२२, दि.११/०८/२०२२, व दि.१५/११/२०२२ रोजी सुनावणी देण्यात आली आहे. सुनावणी दरम्यान संबंधीतांनी सादर केलेले पूरावे व कागदपत्रे तपासून भाडेपट्टा नूतनीकरण करणेकामी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडून प्राप्त अहवालानुसार शासन स्तरावरुन प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पालघर व ठाणे जिल्ह्यात वन मजूरांना (वाईल्ड लाईफ) थकीत असलेला पगार देण्याबाबत

**(१०) ५०७१५ (२७-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर व ठाणे जिल्ह्यात वन मजूरांना (वाईल्ड लाईफ) माहे मार्च, २०२२ पासूनचे वेतन अद्यापपर्यंत देण्यात न आल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची परिस्थिती येऊन त्या मजूरांना त्वरीत पगार द्यावा, अशी मागणी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व वन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच हे वन मजूर हंगामी वन मजूर म्हणून मागील ३० वर्षे काम करीत असून त्यांना अद्यापही कायमस्वरुपी सेवेत घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त वन मजूरांना थकीत असलेला पगार त्वरीत देण्याबाबत व त्यांना कायमस्वरुपी सेवेत घेण्याबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०२३) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली या कार्यालयाने ज्या कालावधी साठी मजूर कार्यरत होते त्या कालावधी पर्यंतचे सर्व वेतन अदा केले आहे. त्याचबरोबर, तानसा वन्यजीव अभयारण्यातील सर्व वन मजूरांची थकीत मजूरीसुध्दा अदा करण्यात आली आहे.

(२) (३) व (४) हे खरे नाही. उक्त वनमजूरांना थकीत मजूरी अदा करण्यात आली आहे.

महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.३१.०१.१९९६ अन्वये दि.०१.११.१९८९ ते दि.३१.१०.१९९४ पर्यंत सलग ५ वर्षे योजना / योजनेत्तर अंतर्गत किमान २४० दिवस प्रतीवर्ष याप्रमाणे काम केलेल्या मजुरांना दि.०१.११.१९९४ पासून नियमित करण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि.१६.१०.२०१२ अन्वये दि.०१.११.१९९४ ते दि.३०.०६.२००४ पर्यंत योजना / योजनेत्तर अंतर्गत किमान २४० दिवस प्रतिवर्ष याप्रमाणे सलग

किंवा तुटक-तुटकरित्या किमान ५ वर्षे काम केलेल्या मजुरांना दि.०१.०६.२०१२ पासून नियमित करण्यात आले आहे. त्यानुसार सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार पात्र असणाऱ्या रोजंदारी मजुरांना नियमित करण्यात आले आहेत.

तसेच सदर शासन निर्णयानुसार हंगामी मजुरांना तीन महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी सलगरित्या कामावर ठेवण्यात येत नाही.

---

## अचलपूर (जि.अमरावती) येथील मौ. उपात खेडा मार्गावरील निसर्गसंवर्धन केंद्र पर्यटकांसाठी खुले करण्याबाबत

**(११) ५२१५६ (१९-०१-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) येथील मौ. उपात खेडा मार्गावरील निसर्ग संवर्धन केंद्र मागील पाच वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निसर्ग संवर्धन केंद्राचे अनुदान प्रलंबित असून सदर काम अर्धवट स्थितीतच थांबल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून या उपक्रमाला निधी उपलब्ध करुन देवून अर्धवट स्थितीचे काम पूर्ण करुन केंद्र पर्यटकांना खुले करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०२३) :**(१)व(२) हे खरे नाही.

सामाजिक वनीकरण विभागातर्फे मौ.उपात खेडा येथील स्व.उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यानाशी संबंधित विकासात्मक कामे ही दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत पूर्ण करुन सदर उद्यान अमरावती वन विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सद्यःस्थितीत मौ.उपात खेडा येथील जैवविविधता उद्यान केंद्र हे पर्यटकासाठी खुले करण्यात आले आहे. सद्यःस्थितीत संयुक्त वन व्यवस्थापन समिती उपातखेडाव्दारे सदर ठिकाणी पर्यटनाचे नियंत्रण केले जात आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनने मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यातील शासकीय जमिनीवर असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका खरेदीखत न करता केवळ हस्तांतरण शुल्क आकारून हस्तांतरीत करण्याबाबत

**(१२) ५२१६३ (२९-०१-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनने १९८३ पूर्वी कब्जेहक्काने ९९ वर्षाच्या कराराद्वारे (लीजने) दिलेल्या शासकीय जमिनीवरील इमारतमधील सदनिकांची हस्तांतरण खरेदी-विक्री करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगीची आवश्यकता नसल्याचा महत्वपूर्ण निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास दिला हे खरे आहे काय,

(२) तसेच, मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यात महसूल विभागांतर्गत असलेल्या जमिनी सन १९८३-८४ मध्ये वा त्यासुमारास सहकारी गृहनिर्माण संस्थां भाडे तत्वावर देण्यात आल्या असून सदर जमिनींची मालकी गृहनिर्माण संस्थेऐवजी जिल्हाधिकारी मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडेच ठेवण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुळ सदस्यांकडून सदर सदनिका हस्तांतरण शुल्क आकारून हस्तांतरण करणे आवश्यक आहे किंवा तसेच हस्तांतरण शुल्क आकारून जमीन व सदनिका जिल्हाधिकारी यांच्या मालकीची असल्याने सदर हस्तांतरण शुल्क आकारले जाते हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मूळ सदस्य व हस्तांतरणाने सदस्य होवू इच्छिणाऱ्या व्यक्तींना जमीन मूळ सदस्याची नसतानाही खरेदीखत व स्टॅम्प ड्युटी भरून सदर कागदपत्रे जिल्हाधिकारी यांना सादर करावे लागतात हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर शासकीय जमीन गृहनिर्माण संस्था अथवा मूळ सदस्यांच्या नावावर नसतानाही येथील जमिनी / सदनिकांच्या खरेदीखतांचा खर्च तसेच स्टॅम्प ड्युटीचा खर्च करण्यात येत असल्याने सदर जमीन खरेदीखत करून घेणाऱ्या सदस्यांची मालकीची होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, सदरहू निर्णयानुसार मुंबईतील नागरी निवारा प्रकल्पासहित सुमारे १२५० लीजवरील इमारतीमधील अनेक वर्षापासूनची सदनिका खरेदी-विक्री हस्तांतरणांची प्रलंबित असल्याने मार्गी लावण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.३०.०९.२०२२ रोजी दिलेला निर्णय हा मुंबई शहर जिल्ह्यातील शासकीय भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय मिळकतीसंदर्भात आहे.
(२) व (३) हे खरे आहे.
(४) व (५) हे खरे नाही.
(६) व (७) शासन निर्णय दि.०७.०७.२०१७ मधील तरतुदीनुसार सदनिका हस्तांतरणासाठी हस्तांतरण शुल्काची आकारणी करुन ना-हरकत देण्यात येते. शासकीय मिळकतीवरील इमारतीमधील सदनिका शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतरण झाल्यास, शासन निर्णय दिनांक ०४.०५.२०१८ मधील तरतुदीनुसार हस्तांतरण शुल्काची आकारणी करुन विनापरवानगी झालेले हस्तांतरणे नियमानुकूल करण्यात येतात.
मुंबई उपनगरातील नागरी निवारा प्रकल्पातील सदनिका, (न्यायिक/अर्धन्यायिक व त्रुटींची पूर्तता न केलेली प्रकरणे वगळता) इतर सर्व प्रकरणे हस्तांतरण शुल्क आकारुन नियमानुकूल करण्यात आलेली आहेत.

---

**राज्य शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यास शासनाकडून थेट वस्तू विकत घेऊन देण्याबाबत..**

**(१३) ५३९९१ (१८-०१-२०२३). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी मागासवर्गीय गरीब लाभार्थ्यांना सुरुवातीला स्वतःचे पैसे खर्च करून शेती वा इतर व्यवसाय संबधित वस्तू विकत घ्याव्या लागतात व त्यानंतर शासनातर्फे महा डीबीटी प्रणाली द्वारे त्याचे अनुदान लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,लाभार्थ्याची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने लाभार्थ्याला योजनेचा लाभ घेण्याआधीच कर्जबाजारी होऊन वस्तू विकत घ्याव्या लागतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार शासनाच्या विविध योजनांतर्गत लाभार्थ्यास शासनाकडून थेट वस्तू विकत घेऊन देण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे काय,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०३-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध राज्य शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्वच लाभार्थ्यांना त्यांच्या पसंतीनुसार यंत्र/औजारे संपूर्ण रक्कम भरुन खुल्या बाजारातून खरेदी करता येते. थेट लाभ हस्तांतरण धोरणानुसार अनुदानाची रक्कम लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर जमा करण्यात येते.
(२) हे अंशत: खरे आहे.

(३) सध्या राबविण्यात येत असलेली प्रक्रिया शासनाच्या थेट लाभ हस्तांतरण धोरणास अनुसरुन राबविली जाते. सबब, या प्रकरणी चौकशी करण्याचा व शासनाकडून थेट वस्तू विकत घेऊन देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी तालुक्यातील जुने वेहेळे गांव, नविन गांव सुरई येथील जुना सर्व्हे क्रं. १६/४ व नविन सर्व्हे क्रं. ४०/४ मध्ये तहसिलदारसोबत नोंदणीकृत विक्रीकरार असतांना ते डावलून बनावट आदेश पारीत केल्याबाबत**

**(१४) ५५९३३ (२९-०१-२०२३). श्री.कैलास गोरंट्याल (जालना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी तालुक्यातील जुने वेहेळे गांव, नविन गांव सुरई येथील जुना सर्व्हे क्रं.१६/४ व नविन सर्व्हे क्रं. ४०/४ मध्ये मुळ शेतकऱ्यांचे ३२ एम प्रमाणे तहसिलदारसोबत नोंदणीकृत विक्री करार असतांना ते डावलून संशयास्पद बनावट आदेशाने एका बोगस शेतकऱ्याचे बेकायदेशीर नोंद झालेल्या कुळाबाबत शेतजमिन न्यायाधिकरण भिवंडी व महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, मुंबई यांच्याकडे दिनांक १७ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील जुने वेहेळे गांवापासून इतर दोन नविन गावे निर्माण झाल्याने सर्व्हे नंबरांचा गोंधळ झाला त्याचा गैरफायदा घेऊन बनावट खातेदारांनी मुळ शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर शेतजमिन न्यायधीकरणांचे बनावट आदेश दाखवुन मुळ शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर साधे कुळ म्हणुन नांवे दाखल केले हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन १९६६ या कालावधीत झेरॉक्स तंत्रज्ञान नसल्याने काही आदेशांचे हस्तलेखन एकाच वेळेस तंतोतंत जुळत असल्यामुळे सदर आदेशांचे संशय निर्माण झालेले आहे आणि याबाबत हस्ताक्षर तज्ञांनी त्यांचे अभिप्राय दिले आहे अशी तक्रार शेतजमिन न्यायाधीकरण भिवंडी व महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण मुंबई यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार मुळ शेतकऱ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१४-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
दि.१७/११/२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल झाला आहे.
(४) प्रकरणी जमिनीबाबत महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई यांचेकडे अपील अर्ज दाखल असून त्यामध्ये या न्यायाधिकरणाने अंतरिम आदेश पारीत केले असून सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
( ५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाज्योतीकडून प्रशिक्षण कार्यक्रम देणाऱ्या संस्थांच्या निवड प्रक्रियेच्या निविदेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(१५) ५५९३९ (२९-०१-२०२३). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाज्योतीकडून UGC NET/MH CET/CSIR या परीक्षांकरिता प्रशिक्षण कार्यक्रम देणाऱ्या संस्थांची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया दिनांक ०३ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास सुरु करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रियेत अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याचे सकृतदर्शनी निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सीआरजी ॲकेडमी सक्सेस प्रा.लि. (CRG ACADEMY SUCCESS PRIVATE LIMITED) या संस्थेस नियमांचे उल्लंघन करुन सदर संस्थेस निविदा उपलब्ध करुन देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सीआरजी ॲकेडमी सक्सेस प्रा.लि. (CRG ACADEMY SUCCESS PRIVATE LIMITED) या संस्थेचा प्रशिक्षण कार्यक्रमातील अनुभव कमी असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर कार्यारंभ आदेश तसेच सदरहू निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०३-०७-२०२३) :** (१) होय
(२) व (३) नाही
(४) व (५) तक्रारी प्राप्त झाल्या हे खरे आहे. तथापि, महाज्योती नागपूर मार्फत नेट-सेट चे प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थाची निवड करण्यासाठी एकूण ४ प्रस्ताव प्राप्त झाले, सदर प्रस्तावाचे मुल्यांकन हे निविदेत नमूद केलेल्या निकषानुसार करण्यात आले आहे.

प्राप्त ४ प्रस्तावांपैकी ३ प्रस्ताव तांत्रिकदृष्या पात्र ठरले होते. तिन्ही निविदांचे तांत्रिक गुणांकन करण्यात आले, या गुणांकनामध्ये सी.आर.जी. ॲकडमी प्रा.लि. पुणे, बी. के. एज्युकेशन आणि वेलफेअर सोसायटी, नाशिक हे अंतिम पात्र ठरले होते.

सी.आर.जी. ॲकडमी प्रा.लि. यांना इतर शासकीय संस्थेत युसीजी नेट, सेट परीक्षेचे प्रशिक्षण देण्याचा अनुभव, मागील ३ वर्षात युसीजी नेट, सेट परीक्षेत संस्थेचे उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्येचे प्रमाण देखील १५ टक्कयांपेक्षा अधिक असल्याचे दिसून आलेले आहे. महाज्योतीने अवलंबलेली निविदा प्रक्रीया योग्य असून त्यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात नैसर्गिक आपत्तींमुळे तसेच बदलत्या हवामानामुळे पिकांचे मोठे नुकसान होत असल्याबाबत

**(१६) ५६५१० (१३-०४-२०२३). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ(येवला), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :**सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नैसर्गिक आपत्तींमुळे तसेच बदलत्या हवामानामुळे पिकांवर विपरित परिणाम होऊन कृषी क्षेत्राचे मोठे नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बदलत्या हवामानाचा पिकांवर होणारा परिणाम व त्यास अनुसरुन करावयाच्या उपाययोजना यांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने समिती वा अभ्यासगट नेमण्याबाबत तसेच सर्वात जास्त नुकसान, कमी शेतजमीन असलेल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांना झाल्याची बाब विचारात घेऊन अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी शासनाकडून विशेष उपाययोजना आखण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांची जमीन, जमिनीचा प्रकार, जमिनीचे आरोग्य व पिक पॅटर्न अशा प्रकारची माहिती असलेला डेटा बँक तयार करण्यासाठी शासन विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास सहाय करणे या उद्देशाने विदर्भ व मराठवाडयातील शेतकऱ्यांसाठी जागतिक बँकेच्या अर्थसहायाने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प राबविण्यात येत आहे.

(३) जमाबंदी आयुक्त, संचालक (भूमि अभिलेख) महसूल विभागामार्फत याबाबतची माहिती संकलित करण्यात येत आहे.
(४) विदर्भ व मराठवाडयातील १६ जिल्हातील ५२२० गावांमध्ये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यात दुबार भात शेतीसाठी बियाणे उपलब्ध होत नसल्याबाबत**

**(१७) ५६५५७ (१३-०४-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यात दुबार भातशेती मोठ्या प्रमाणात केल्याने कर्जत-३, ५, ७, १८४ व सहयाद्री-३ ह्या बियाणाची आवश्यकता असल्याने शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी, कृषी बाजार समिती व भात खरेदी विक्री संघ यांच्याशी संपर्क करुनही शेतकऱ्यांना पिकासाठी बियाणे उपलब्ध नसल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना दरवर्षी मिळणारे बियाणे यावर्षी उपलब्ध न होण्याची कारणे कोणती आहेत,
(३) तसेच शेतकऱ्यांची ह्या हंगामासाठी दरवर्षी बियाणाची मागणी असूनही जिल्हा कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांनी उपाययोजना न केल्यामुळे शेतकऱ्यांचा हंगाम उत्पन्नाविना गेल्याने जिल्हा कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांच्याविरुध्द दंडात्मक कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०१-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील ७५ वर्षापुर्वीचे तारापोरवाला मत्स्यालयाच्या जागी जागतिक दर्जाचे मत्स्यालय उभारण्याबाबत,**

**(१८) ५६७२६ (१९-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ७५ वर्षापुर्वीचे तारापोरवाला मत्स्यालयाच्या जागी जागतिक दर्जाचे मत्स्यालय उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३)असल्यास , याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०६-२०२३) :** (१) व (२) हे अशंत: खरे आहे.
तारापोरवाला मत्स्यालय इमारत सद्यस्थितीत धोकादायक असल्याचे संरचनात्मक लेखापरिक्षण अहवालात निष्पन्न झाल्याने नवीन इमारत बांधणेसाठी प्रकल्प सल्लागार समितीची नेमणूक करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील कृषी उप संचालक दर्जाच्या अधिकाऱ्यांनी कामावर बेमुदत बहिष्कार टाकल्याबाबत**

**(१९) ५६७६९ (१३-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी उपसंचालक दर्जाच्या सुमारे १६० अधिकाऱ्यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान कामावर बेमुदत बहिष्कार टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बहिष्कार टाकणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मागण्यांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, याप्रकरणी अधिकाऱ्यांनी बहिष्कार मागे घेऊन कामकाजास सुरुवात करण्यासाठी शासनाने कोणत्या स्वरुपाच्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०४-०७-२०२३) :**(१) हे अंशत: खरे आहे.
महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ अधिकारी कल्याणकारी संघटनेने विविध मागण्यांच्या अनुषंगाने सामुहिक रजा आंदोलन केले होते.
(२) महाराष्ट्र कृषि सेवा, गट-अ (वरिष्ठ), अधिक्षक कृषि अधिकारी संवर्गात पदोन्नतीचे आदेश तात्काळ निर्गमित करण्यात यावेत, सेवा ज्येष्ठता यादी दरवर्षी प्रसिध्द व्हावी व रिक्त जागांप्रमाणे पदोन्नती दरवर्षी देण्यात यावी, विभागीय चौकशी व न्याय निर्णयाच्या अधीन राहून पदोन्नती देण्यात यावे, सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांचे नादेय प्रमाणपत्र व त्यांना मिळणारे लाभ वेळेत मंजूर करावे, परिविक्षाधीन कालावधी वेळेवर पूर्ण करणे, विभागीय चौकशीची प्रकरणे, कृषि विभागातील पदांची समकक्षता इतर व्यावसायिक विभागातील पदांबरोबर प्रस्थापित करण्यात यावी, अशा स्वरुपाच्या मागण्या करण्यात आल्या होत्या.
(३) उपरोक्त नमूद मागण्यांच्या अनुषंगाने शासनस्तर तसेच आयुक्तालयस्तरावरुन करण्यात आलेल्या /झालेल्या कार्यवाहीबाबत विभाग प्रमुख या नात्याने संघटनेच्या पदाधिकाऱ्या समवेत आयुक्त (कृषि) यांची सकारात्मक चर्चा झाल्याने संघटनेने सामुहिक रजा आंदोलन मागे घेतले आहे. तसेच चर्चेदरम्यान सर्व सेवाविषयक बाबी नियमानुसार व तातडीने करण्याबाबत सर्वसंबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हसरूळ (ता.जि.नाशिक) येथील गट न. २५७ क्षेत्र १४ हे. ३१ आर जागा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक अंतर्गत वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालयासाठी देण्याकरिता महसूल विभागाकडून विलंब होत असल्याबाबत**

**(२०) ५६९३७ (१०-०५-२०२३). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हसरूळ (ता.जि.नाशिक) येथील गट न. २५७ क्षेत्र १४ हे. ३१ आर ही मोकळी जागा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक अंतर्गत वैद्यकीय महाविद्यालय रूग्णालयासाठी देण्याकरिता विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक १२ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव महसूल यांना पाठविलेला प्रस्ताव माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील मोकळा भूखंड महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ अंतर्गत वैद्यकीय महाविद्यालयाला देण्यात यावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ठिकाणी आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय आणि पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था इमारतीच्या बांधकामाला शासनाने दिनांक २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता देवूनही प्रश्न भाग (१) मधील जागा आरोग्य विज्ञान विद्यापीठाला न दिल्यामुळे या इमारतीचे बांधकाम माहे जानेवारी, २०२३ पर्यंत सुरु झालेले नाही,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्न भाग (१), (२) व (३) अन्वये म्हसरूळ येथील गट न. २५७ क्षेत्र १४ हे. ३१ आर हा मोकळा भूखंड महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडे हस्तांतरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) मौजे म्हसरूळ ता. जि. नाशिक येथील सर्व्हे नं. २५७ मधील १४ हे. ३१ आर शासकीय जमीन कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांना सदर विद्यापीठाच्या विस्तारीकरणासाठी (शैक्षणिक वैद्यकीय महाविद्यालय, हॉस्पीटल इ. जनहितासाठी उपक्रम राबविणे,

विद्यापीठाचे विस्तारीकरण व संशोधन संस्था स्थापन करणे) याकरीता महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट करणे ) नियम १९७१ च्या नियम ५ व नियम ६ (१) (चार) (ब) नुसार भोगाधिकार मूल्यरहीत व महसूलमुक्त किंमतीने नियमीत अटी व शर्तीवर महसूल विभागाच्या दिनांक २०/४/२०२३ रोजीच्या ज्ञापनाव्दारे प्रदान करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात "लम्पी" चर्मरोगाचा प्रादुर्भाव होवून हजारो पशुधन मृत्यूमुखी पडल्याबाबत**

**(२१) ५७४३० (०९-०५-२०२३). श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.राजन साळवी (राजापूर), श्रीमती नमिता मुंदडा (केज), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुणे,सांगली, रत्नागिरी,सोलापूर,बुलढाणा,बीड तसेच मंगळवेढा , पंढरपूर , राजापूर तालुक्यात गत वर्षापासून हजारो जनावरामध्ये "लम्पी" या रोगाचा प्रादुर्भाव झाला असून सुमारे ५० हजारापेक्षा जास्त पशुधनाचा मृत्यु झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लसीकरण मोहिमे मध्ये असलेली अनियमितता,पशू संवर्धन विभागाच्या कर्मचाऱ्यांची अनास्था, परिणामी वेळीच उपचार न झाल्याने मोठया प्रमाणात जनावरे मृत्यूमुखी पडली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंगळवेढा व पंढरपूर तालुक्यात सर्वत्र जनावरांना लंम्पीची लस उपलब्ध करण्यासाठी यापूर्वी संबंधीत विभागाला पत्र देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नुकसानग्रस्त पशुपालकांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची घोषणा राज्य शासनाने केली होती परंतु मयत पशुधनापैकी केवळ १५% पशुधनाची नुकसान भरपाई आतापर्यंत देण्यात आली आहे तसेच देण्यात येणारी मदत ही अत्यंत अल्प स्वरुपाची आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत, जास्तीत जास्त लस उपलब्ध करून देण्यासह तसेच "लम्पी" या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याबाबत शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०६-२०२३) :** (१) व (२) राज्यातील ३५ जिल्हयांमध्ये गोवंशीय पशुधनामध्ये लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव निदर्शनास आलेला असून, दि.२५.०५.२०२३ अखेरपर्यंत एकूण ३९,२८१ गोवंशीय पशुधनाचा या रोग प्रादुर्भावामुळे मृत्यु झालेला आहे.

पशुसंवर्धन विभागाने या रोग प्रादुर्भावाची वेळीच दखल घेवून प्रतिबंधात्मक लसीकरण व बाधित पशुंवर औषधोपचार केलेले असल्याने मर्तुक नियंत्रणात राहिलेली आहे.

(३) सोलापूर जिल्हयातील एकूण ७,४५,४०४ गोवंशीय पशुधनासाठी एकूण ७,४५,५०० लसमात्रा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत व यामधून जिल्हयातील जवळपास १०० टक्के गोवंशीय पशुधनास प्रतिबंधात्मक लसीकरण करण्यात आलेले आहे.
(४) केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निवारण धोरणामधील निकषानुसार लम्पी चर्मरोग प्रादुर्भावामुळे मृत पावलेल्या पशुधनास राज्य शासनाच्या निधीमधून १०० टक्के अर्थसहाय्य करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून, दि. २५.०५.२०२३ अखेर ९४ टक्के म्हणजेच एकूण ३६,८४७ मृत पशुधनाच्या मालकांना रु. ८९.४२ कोटी अर्थसहाय्य अदा करण्यात आलेले आहे. यामध्ये सोलापूर जिल्हयातील ३५१० मृत पशुधनाच्या मालकांना अदा केलेल्या रु. ८.३७ कोटी निधीचा समावेश आहे.
(५) राज्यातील गोवंशीय पशुधनामध्ये उद्भवलेला लम्पी चर्मरोग प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी संपूर्ण राज्याचे क्षेत्र नियंत्रित क्षेत्र म्हणून घोषित करणे, राज्यस्तरीय कार्यदलाचे गठन करणे, १०० टक्के पशुधनास शेतकऱ्यांच्या दारात मोफत

प्रतिबंधात्मक लसीकरण, बाधित जनावरांवर मोफत औषधोपचार करणे, किटक, डास, माशा इ. वर किटकनाशक औषध फवारणी करणे यासाठी आवश्यक मनुष्यबळाची बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्ती करणे, मृत पशुधनासाठी अर्थसहाय्य देणे, जिल्हा नियोजन समितीकडील निधीमधून प्रति जिल्हा रु. ३.०० कोटी निधी उपलब्ध करुन देणे, राज्यात "माझा गोठा स्वच्छ गोठा" मोहिम राबविणे इ. उपाय योजना करण्यात आलेल्या असून, पशुसंवर्धन विभागांतर्गत पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे या प्रयोगशाळेत लम्पी चर्मरोग प्रतिबंधक लसीची निर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तिवसा शहर (जि.अमरावती) येथे वन जमिनीवर निसर्ग पर्यटन केंद्र निर्माण करण्याबाबत

**(२२) ५७८९३ (२१-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिवसा शहर (जि.अमरावती) येथे कॅनॉलला लागून वन विभागाची २० एकर जमीन असून निसर्ग पर्यटन केंद्राची निर्मिती करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २९ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास उपवनसंरक्षक वन विभाग यांना निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरापासून आठ किलोमीटरवर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे मोझरी हे ठिकाण असून आजूबाजूच्या परिसरात कोणतेही पर्यटन स्थळ नसल्यामुळे नागरिकांच्या व पर्यटकांच्या सोयीसाठी निसर्ग पर्यटन केंद्र सुरु होणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे,
दिनांक १९ जानेवारी, २०२० रोजी तिवसा शहरामध्ये असलेल्या ८.५ हेक्टर वनक्षेत्रावर निसर्ग पर्यटन केंद्र तयार करण्याच्या सूचना प्राप्त झालेल्या होत्या.
(२) व (३) तिवसा शहर (जि.अमरावती) येथे वन जमिनीवर निसर्ग पर्यटन केंद्र निर्माण करण्याबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) अमरावती यांनी सन २०१९-२० ते २०२०-२१ पर्यंतचे आराखडा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचेकडे मंजूरीकरीता पाठविला आहे. आराखडयात दर्शविल्यानुसार सुरुवातीला सदर ठिकाणी संरक्षणाकरीता जिल्हायोजना लेखाशिर्ष-४४०६-२९९६ निसर्ग पर्यटन अंतर्गत चेनलिंग फेन्सींग कामे करण्यात आलेली असून, सन २०२१-२२ मध्ये ५ हेक्टर क्षेत्रावर लेखाशिर्ष-२४०६-५०९८ निकृष्ठ वनाचे पुर्नवनीकरण कार्यक्रमा अंतर्गत मिश्ररोपवन सुध्दा घेण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दाभोळ सागरी महामार्गावरील (ता.दापोली, जि. रत्नागिरी) खाडीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(२३) ५८०२४ (२६-०४-२०२३). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दाभोळ सागरी महामार्गावरील (ता.दापोली, जि.रत्नागिरी) खाडीवर पुलाचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुलाचे बांधकाम कधीपर्यंत होणार आहे व त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुसार दाभोळ खाडीवरील पुलाच्या बांधकामास निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) मा. उपमुख्यमंत्री यांच्या दि.१०.०१.२०२२ रोजी झालेल्या आढावा बैठकीमध्ये दाभोळ येथील खाडीवर दोन पदरी पुल बांधण्यासाठीचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यास अनुसरुन प्रकल्प सल्लागारामार्फत सुसाध्यता अहवालानुसार अंदाजपत्रक तयार करण्यात येत असून प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्याचे प्रस्तावित आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निविदा विषयक कार्यवाही हाती घेण्याचे प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अमरावती जिल्ह्यातील बँकामार्फत शेतकऱ्यांच्या खात्यामधून अतिवृष्टीच्या मदतीची कृषीकर्जात कपात होत असल्याबाबत

**(२४) ५८४३३ (१९-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे माहे जुलै-सप्टेंबर मध्ये वा त्यादरम्यान शेती पिके नष्ट झाल्याने शासनाने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यात पाठविण्यात आली असून शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानातून पिककर्ज वा कोणतेही कर्ज रक्कम कपात करु नये अशा शासनाच्या सूचना होत्या, हे खरे आहे काय,
(२) तसेच टेंभूरखेडा (ता.वरुड) येथील विष्णु मंगर्दे या शेतकऱ्याचे युनियन बँक शाखा वरुड, नांदगाव ख. येथील सेंट्रल बँक आणि स्टेट बँक या शाखेने शेतकऱ्यांच्या खात्यातून कृषिकर्ज कपात केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जिल्ह्यातील बँक व बँकेचे अधिकारी मनमानी कारभार करीत असून त्यांच्यावर कार्यवाही करण्याची मागणी शेतकाऱ्यांकडून होत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिवृष्टीच्या अनुदानातून कपात केलेल्या कृषी कर्जाची रक्कम शेतक-यांना परत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-०६-२०२३) :** (१) होय.
(२) नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रावेर व यावल (जि.जळगाव) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी सावकारांनी बळकावल्याबाबत

**(२५) ५८४५६ (२१-०४-२०२३). श्री.अनिल पाटील (अमळनेर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावेर व यावल (जि.जळगाव) येथील १९ शेतकऱ्यांची ९६ एकर शेत जमीन व काही मालमत्ता सावकारांनी बळकावण्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारींच्या अनुषंगाने तसेच जमीन बळकावणाऱ्या सावकारांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०७-२०२३) :** (१),(२) व (३) हे खरे आहे.
जळगांव जिल्हयात सन २०२१-२०२२ या वर्षात एकुण १४४ परवानाधारक सावकार असून सदर कालावधीत १६६७ एवढया कर्जदारांना २८०.०५ लाख बिगरशेती कर्ज वाटप केलेले आहे. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अंतर्गत अवैध सावकारी विरुध्द १७ शेतकऱ्यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जळगांव यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केले आहेत.

सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने १७ प्रकरणांमध्ये सुनावणी घेण्यात आली असून १६ प्रकरणांमध्ये संबंधीतांचे सावकारीचे दस्त रद्द करून ३९ हेक्टर शेती शेतकऱ्यांना परत करण्यात आलेली आहे.तसेच एका प्रकरणामध्ये अवैध सावकारी आढळून न आल्याने प्रकरण निकाली काढण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कृषी क्षेत्रात ड्रोनचा उपयोग करण्याकरिता अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२६) ५८४८० (२१-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कृषी क्षेत्रात ड्रोनच्या उपयोगाला प्रोत्साहन देण्यासाठी ड्रोन उत्पादक कंपनी आयोटेक वर्ल्ड एव्हीगेशनने राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाशी करार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात कृषी पायाभूत निधीच्या माध्यमातून ड्रोन खरेदीसाठी किफायतशीर दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी कृषी क्षेत्रातील ड्रोनचा उपयोग पाहता कृषी यंत्रे आणि औजारे तपासणी संस्था, भारतीय कृषी संशोधन परिषदेशी संलग्न संस्था, कृषी विज्ञान केंद्र, शेतकरी उत्पादक संस्था आणि कृषी विद्यापीठांना ड्रोन खरेदीसाठी शासन अनुदान उपलब्ध करुन देणार आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (२८-०६-२०२३) :** (१) होय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व ड्रोन उत्पादक, आयोटेक वर्ल्ड एव्हीगेशन कंपनी, यांच्यामध्ये दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी ड्रोनच्या शेतीमध्ये वापरासंबंधी प्रयोग करणे तसेच इच्छुक शेतक:यांना ड्रोन चालविण्याचे प्रशिक्षण देणे या उद्देशासाठी सामंजस्य करार झालेला आहे.
(२) होय, केंद्र शासनाच्या कृषि पायाभूत निधीमधून भाडे तत्वावरील कृषि औजारे सेवा सुविधा केंद्र स्थापनेसाठी लाभार्थी हिश्याचे निधीकरिता ३%सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध आहे.
(३) शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कृषि यंत्रे आणि औजारे तपासणी संस्था, भारतीय कृषि संशोधन परिषदेशी संलग्न संस्था, कृषि विज्ञान केंद्र, कृषी विद्यापीठ यांना १००% अनुदानाची तरतूद आहे. शेतकरी उत्पादक संस्थांना प्रात्यक्षिक हा घटक राबविण्यासाठी ड्रोन व त्याची संलग्न साहित्य खरेदी करावयाची असल्यास त्यासाठी किंमतीच्या ७५ % अथवा ७.५० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान देय आहे.कृषि औजारे बँकेची स्थापना या घटकाखाली शेतकरी गट, शेतकरी उत्पादक संस्था, शेतकऱ्यांची सहकारी संस्था यांना किंमतीच्या ४०% अथवा ४ लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान देय आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यात शेतकऱ्यांनी केलेल्या ऑनलाईन अर्जांपैकी शेतकऱ्यांचे ठिबक योजनेचे प्रस्ताव रद्द करण्यात आल्याबाबत**

**(२७) ५८६३२ (१९-०४-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.संजयमामा शिंदे (करमाळा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील ठिबक सिंचन योजनेसाठी २८ हजार ८६२ शेतकऱ्यांनी माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान ऑनलाईन अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापैकी १४ हजार ५७१ शेतकऱ्यांचे ठिबक सिंचन योजनेचे प्रस्ताव रद्द करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी मोठ्या प्रमाणात प्रस्ताव रद्द करण्याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०३-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय. महाडिबीटी प्रणाली प्रक्रीयेनुसार लॉटरीमध्ये निवड झालेल्या ज्या शेतकऱ्यांनी १० दिवसांच्या मुदतीमध्ये कागदपत्रे अपलोड न केल्यामुळे तसेच ज्या शेतकऱ्यांना संच खरेदीसाठी पूर्वसंमती मिळालेली आहे परंतु त्यांनी ३० दिवसांच्या मुदतीमध्ये संच खरेदी करुन कार्यान्वित केल्याबाबत आवश्यक कागदपत्रे सादर न केलेल्या शेतकऱ्यांचे अर्ज रद्द झाले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गुंज (ता.वाडा, जि.ठाणे) येथील वन खात्याच्या ताब्यात असलेला टेम्पो पाली काष्ट विक्री आगारातून चोरट्यांनी पळविल्याबाबत

**(२८) ५८७८५ (१९-०४-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गुंज (ता.वाडा, जि.ठाणे) येथील जंगलात खैराची चोरटी वाहतूक करणारा वन खात्याच्या ताब्यात असलेला टेम्पो पाली काष्ट विक्रीआगारातून चोरट्यांनी पळविल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबंधितांवर चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे,
गुंज (ता.वाडा, जि.पालघर) येथील जंगलात खैराची चोरटी वाहतूकीच्या गुन्हयामध्ये एक आयशर टेम्पो जप्त करण्यात येऊन विक्री आगार पाली येथे ठेवण्यात आला होता. सदर वाहन अज्ञात इसमांनी दि.३०.१२.२०२२ रोजी खैर ५३ नग, १.०५८ घ.मी. मालासह पळवून नेल्याची घटना घडली होती.
(२) सदर अवैध वाहतूकीच्या गुन्हयाची चौकशी केली असता, एक आयशर टेम्पो मधील खैर ५३ नग, १.०५८ घ.मी. चा माल श्री.अविनाश शांताराम पष्टे, रा. निचोळे यांचे मौजे, निचोळे यांच्या मालकी गट नंबर १५५ मधील असल्याचे दिसून आले आहे. तसेच सदरचे वाहनाबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी,ठाणे यांच्याकडे तपासणी केली असता श्री. जोशीमुद्दीन मोम्लूत, रा. राजनोली, दांडेकरवाडी, ठाणे यांचे नावे असल्याने वाहन मालकास चौकशीकामी हजर राहण्यासाठी नोटीस पाठविण्यात आली होती. परंतु संबधित वाहनमालक सदर पत्यावर राहत नसल्याने नोटीस परत आली आहे.
दि.३०.१२.२०२२ रोजी रात्री आयशर टेम्पो खैर ५३ नग, १.०५८ घ.मी. हा अज्ञात इसमांनी विक्री आगार पाली मागील बाजूस शेती लगतच्या भागातून अंधाराचा फायदा घेऊन वनोपज मालासह येथून पळवून नेला असल्याचे रात्रपाळीसाठी कार्यरत असलेल्या हंगामी वनमजुराच्या दि.३१.१२.२०२२ रोजी निदर्शनास आले. याप्रकरणी क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी यांनी विक्री आगार व आजुबाजुच्या क्षेत्राची तपासणी केली असता आयशर टेम्पो आढळून आला नाही. त्यामुळे वनरक्षक,विक्री आगार, पाली यांनी आयशर टेम्पो मालासह चोरी झाल्याबाबतची तक्रार वाडा पोलीस स्टेशन येथे नोंदविली असुन पोलीस यंत्रणा सदर गुन्ह्याचा तपास करीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाने टाकलेल्या धाडीत ५७ लाखाचा बनावट मद्य साठा जप्त केल्याबाबत**

**(२९) ५८८९१ (२०-०४-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील पडघा कल्याण रस्त्यावरील देवरुंग गावातील एका गोदामातून आणि कल्याण शहरातील एका सोसायटीत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने दिनांक २२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास धाड टाकून ५६ लाख ७५ हजार रुपयांचा बनावट विदेशी मद्य साठा जप्त केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दमण, हरियाणा आणि महाराष्ट्रातील उत्पादित बनावट मद्याचे २९१ खोके जप्त करण्यात आले आहेत , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने संबंधितावंर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (२०-०६-२०२३) :**(१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी चौकशी करुन खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

i) दि. २२.१.२०२३ रोजी गाळा नं. ५, देवरुंग, बापगाव, या ठिकाणी निरीक्षक, राउशु, कल्याण यांनी छापा टाकला असता, तेथे महाराष्ट्र निर्मित तसेच दमण व हरियाणा निर्मित मद्य आढळून आले. संबंधिताविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये गुन्हा. रं. क्र. १५/२०२३ नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयात त्या ठिकाणी जप्त करण्यात आलेल्या मुद्येमालाची एकुण किंमत रु.१४,५६,२८०/- इतकी आहे. तेथे २ इसमांना अटक करण्यात आलेली होती.

ii) या गुन्हयाच्या पुढील तपासात व्हरटेक्स सॉलीटरी सोसायटी, कल्याण -मुरबाड रोड, कल्याण (पश्चिम) जि. ठाणे मधील पार्कींग मधील बी.एम.डब्ल्यु. कार क्र. MH-०३-CM-९८४२ मधून रु. २,१९,३६०/- इतक्या रकमेचा मद्यसाठा कारसह जप्त करण्यात आला आहे. त्याठिकाणी जप्त केलेल्या एकुण मुद्येमालाची किंमत रु.४२,१९,३६०/- इतकी आहे.

iii) सदर कारचा मालक (आरोपी क्र.३)/भिवंडी येथील गोडाऊन ताब्यात असलेला इसम याने मा. जिल्हा सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन मिळणेकरीता विनंती अर्ज केला होता. मा. न्यायालयाने तो फेटाळलेला आहे. तद्नंतर संबंधित आरोपीने मा. उच्च न्यायालय मुंबई येथे अटकपुर्व जामिनासाठी अर्ज केला होता. मा. न्यायालयाने त्यास पुढील आदेश होईपर्यत निरीक्षक, राउशु, कल्याण यांचे कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिलेले होते. सदर इसम चौकशीसाठी निरीक्षक कार्यालयात हजर झाले होते. गुन्हयाचा तपास चालू आहे.

iv) उपरोक्त आरोपी क्र. ३ याचे भागीदारी मध्ये मुंबई शहर या जिल्हयात मे. न्यु इंडिया वाईन्स सेलर, एफएल-II अनुज्ञप्ती क्र. ६१ असल्यामुळे त्याचे निरीक्षण करण्यात आले असता, तेथे आक्षेपार्ह बाबी (भिवंडी येथील गोडाऊनमध्ये जप्त केलेल्या मद्यापैकी काही ब्रॅन्ड व बॅच चे मद्य) आढळून आल्यामुळे जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे आदेश दि. २.२.२०२३ अन्वये सदर एफएल-II अनुज्ञप्तीचे व्यवहार पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात आले होते. अनुज्ञप्तीधारकाने आयुक्त, राउशु यांचेकडे अपिल अर्ज दाखल केला होता. आयुक्त, राउशु यांनी त्यांचे आदेश दि. ४.५.२०२३ मध्ये जर अनुज्ञप्तीधारकाने रुपये १ लाख इतक्या रकमेचे तडजोड शुल्क भरले तर जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे आदेश रद्द होतील असे नमूद केले आहे. अनुज्ञप्तीधारकाने सदर रक्कम भरलेली असल्याने त्यांचे व्यवहार सुरु करुन देण्याची प्रक्रिया चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात काही जिल्ह्यात कोरोना संसर्गामुळे मृत झालेल्या कर्जदारांची मालमत्ता बँकांकडे गहाण पडल्याबाबत**

**(३०) ५९०६६ (०९-०५-२०२३). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यात ५७४ कोरोना मृतांच्या नावे २१ कोटी ६९ लाख रुपयांची थकबाकी असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात उक्त मृतांचे घर प्लॉट, शेती बँकांकडे गहाण असून बहुतांश शेतकरी कर्जबाजारी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अमरावती जिल्ह्यात १५९६ नागरिकांचा कोरोना संसर्गामुळे मृत्यू झाला असून अनेक बालके अनाथ झाली असून कुटूंबातील कर्ता पुरुष हरपल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्यातील ७८४ कर्जदारांचा कोविड काळात मृत्यू झाला असून संबंधित कर्जदारांकडे सुमारे सव्वातीन कोटींचे कर्ज थकीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, परभणी जिल्ह्यातील कोरोना संसर्गामुळे मृत्यू झालेल्या ४१ शेतकऱ्यांच्या मालमत्ता विविध सहकारी बँकेकडे कर्जासाठी गहाण ठेवल्यामुळे त्यांच्या कुंटुंबियांना कोणताही व्यवहार करता येत नसल्याने तसेच व्याज व थकबाकीची रक्कमही वाढल्याने व्यक्तिचे कुटुंबीय अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त जिल्ह्यातील शेतकरी बँकांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊन वेळेवर भरणाही करतात, मात्र घरातील कर्ता व्यक्ती गेल्याने कर्ज फेडण्यास कुटूंबांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(७) तसेच कोरोना संसर्गामुळे घरातील कर्ता पुरुषांचा मृत्यू झाल्याने कुटूंबांच्या उदारनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे बँकाची कर्ज फेडणे शक्य नसल्यामुळे त्यांचे थकीत कर्ज माफी करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(८) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेवून या खातेदारांच्या कर्जमाफीबाबत तसेच मयत थकीत कर्जदारांच्या कुटूंबांना दिलासा देण्यासाठी शासनाचे काय धोरण आहे वा तद्नुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१४-०६-२०२३) :** (१) होय.

( २) अंशत: खरे आहे.

(३) होय. कोविड-१९ संसर्गामुळे दोन्ही पालक गमावलेल्या राज्यातील अनाथ बालकांना पाच लाख रूपये मुदत ठेव रक्कम शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत वितरित करण्यात आलेली आहे.

(४) होय.

(५) अंशत: खरे आहे.

(६) होय.

(७) व (८) कर्जमाफीचा प्रस्ताव अद्याप विचाराधीन नाही.

---

## राज्यातील सहकार विभागाने ठेवींच्या संरक्षणासाठी पतसंस्थांनी शासनाकडे रक्कम जमा करण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्याबाबत

**(३१) ५९२१८ (२१-०४-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पतसंस्थांतील ठेवींना संरक्षण देण्यासाठी शासनाने ०.०१० टक्के दराने अंशदान सक्तीची रक्कम जमा करण्यासंबंधी दिनांक ४ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार १६००० पतसंस्थांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लिमिटेड या संघटनेच्या महासचिवांनी तीव्र विरोध करुन यासंदर्भात मा.मुख्यमंत्री, मा.सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य व सहकार आयुक्त, महाराष्ट्र शासन यांना दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्णयानुसार पतसंस्थांच्या एकूण १ लाख १० हजार कोटींच्या ठेवीसाठी तीन वर्षांचे रुपये २१६ कोटी अंशदान रक्कम जमा करण्याचे आदेश काढल्यामुळे पतसंस्थेच्या नफा क्षमतेवर परिणाम होऊन सदरहू संस्था आर्थिकदृष्ट्या कोलमडून जाण्याचा धोका निर्माण झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हास्थैर्य निधी सहकारी संघ या संस्थेच्या माध्यमातून लिक्वीडीटी बेस प्रोटेक्शन फंडांतर्गत ठेवींना संरक्षण देण्याच्या योजनेस आधीच शासनाची मान्यता असून मागील १० वर्षांपासून यशस्वीरित्या कार्यरत असल्याने हीच योजना कायम ठेवण्याची मागणी फेडरेशनने शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त फेडरेशनच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०७-२०२३) :** (१) पतसंस्था फेडरेशनने सादर केलेल्या निवेदनातील मुद्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन फेडरेशनला अवगत करणेबाबत सहकार आयुक्तांना दि. २५.११.२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(२) शासनाने राज्यातील नागरी/ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या कामकाजामध्ये गुणात्मक सुधारणा करण्यासाठी आणि त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी अधिनियमातील तरतूदीनुसार दिनांक ३१.१.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये नियमाक मंडळ गठीत केले आहे.

तसेच पतसंस्थांतील ठेवीदारांच्या ठेवींना संरक्षण देण्याकरीता अधिनियमातील तरतूदींनुसार दिनांक ११.९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये स्थिरीकरण व तरलता निधी स्थापन करण्यात आला आहे. सदर निधीसाठी अंशदानाचा दर १० पैसे प्रति १०० रुपये ठेव असा आहे. मात्र अशा प्रकारे अंशदान देण्यास बऱ्याच पतसंस्थांनी तसेच पतसंस्था फेडरेशन ने विरोध केला असून अंशदानाची तरतूद रद्द करण्याची मागणी देखील केली आहे. त्यानुषंगाने संबंधीत घटकांशी चर्चा करुन सुयोग्य अंशदान लागू करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

(३) व (४) अहमदनगर जिल्हयातील जिल्हास्थैर्य निधी सहकारी संघ या संस्थेच्या माध्यमातून लिक्वीडीटी बेस प्रोटेक्शन फंडातर्गत ठेवींना संरक्षण देण्याच्या योजनेस राज्य शासनाची मान्यता घेण्यात आलेली नाही. तसेच सदर योजना कायम ठेवण्याची लेखी/मागणी/निवेदन फेडरेशनने सहकार आयुक्तांकडे किंवा शासनाकडे सादर केलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यातील कृषी विभागात अधिकारी व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(३२) ५९५१४ (२१-०४-२०२३). श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील कृषी विभागात अधिकारी आणि कर्मचा-यांची ६३५ पैकी २०९ पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे बियाणे-खतांच्या नमुन्यांपासून तर कृषी साहित्य विक्री केंद्राच्या तपासणी योजनांची जनजागृती कामे रखडली असून गरजू शेतकऱ्यांना या योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३०-०६-२०२३) :**(१) व (२) अंशत: खरे आहे..
उस्मानाबाद जिल्ह्यातील अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयामध्ये एकूण ६३९ पदे मंजुर असून यापैकी ४२३ पदे भरलेली व २१६ पदे रिक्त आहेत. यापैकी तांत्रिक संवर्गाची ४०९ पदे मंजूर असून ३३८ पदे भरलेली व ७१ पदे रिक्त आहेत.

शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध शासकीय योजना कृषि सेवेतील (तांत्रिक संवर्गातील) अधिकारी/कर्मचारी (तालुका कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि सहाय्यक) यांचेमार्फत राबविण्यात येतात. उक्त रिक्त असणाऱ्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे.
(३) महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील कृषि अधिकारी/मंडल कृषि अधिकारी या पदांवर दि.१८.११.२०२२ च्या आदेशान्वये पदोन्नतीने ०६ अधिकाऱ्यांना उस्मानाबाद जिल्ह्यात पदस्थापना दिलेली आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता कृषि सेवा परीक्षा-२०२१ करिता एकूण २०३ आणि कृषि सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा संवर्गाचे सन २०२१ करीता एकूण २४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून या पदांकरीता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्यातील रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यासाठी विचार करण्यात येईल.

मर्यादित विभागीय परीक्षेच्या कोट्यातील कृषि पर्यवेक्षकांची पदे कृषि सहाय्यकांमधून भरण्याकरीता दि.०२.०४.२०२३ रोजी परीक्षा पार पडलेली असून सदर परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना कृषि पर्यवेक्षक पदावर पदस्थापना देण्याची कार्यवाही संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर सुरु आहे. त्याचप्रमाणे वित्त विभाग, शासन निर्णय, दि.३१.१०.२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील (वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. त्यानुसार लातूर विभागातील गट-क संवर्गातील लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता एकूण १८ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दि.२०.०१.२०२३ रोजी विज्ञापीत करण्यात आली आहे. तसेच लातूर विभागातील सहाय्यक अधिक्षक एकूण ०६ पदे व वरिष्ठ लिपिक एकूण १४ पदांची जाहिरात दि.०५.०४.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. कृषि विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम झालेला नसल्यामुळे वित्त विभाग, शा.नि. दि.३१.१०.२०२२ मधील तरतूदीनुसार कृषि विभागातील सरळसेवेच्या कोट्यातील उर्वरीत रिक्त पदांची भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोरेगांव ( मुंबई ) आरे वसाहतीमधील अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करण्याबाबत

**(३३) ५९६४४ (१९-०४-२०२३). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगाव पूर्व (मुंबई) येथील आरे वसाहतीमध्ये अनधिकृत फेरीवाले व अनधिकृत बांधकामांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने या परिसरात सार्वजनिक आरोग्याचा व वाहतुक कोंडीचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त विषयान्वये अनधिकृत फेरीवाले व अनधिकृत बांधकामे यांची भविष्यात संख्या वाढू नये यासाठी सुरक्षाव्यवस्थेत बळकटी आणण्यात येत असून महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची सुरक्षा व्यवस्था घेण्याची शासनाच्या विचाराधीन आहे, तसेच सदर विचाराधीन प्रस्तावावर निर्णय घेऊन त्याची अमंलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२१-०६-२०२३) :** (१), (२), (३) व (४) होय, हे अंशतः खरे आहे.
आरे दुग्ध वसाहतीमधील अतिक्रमणावर नियंत्रण ठेवण्याकरिता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून सुरक्षा व्यवस्था घेण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

---

## राज्यात तमाशा, वाल्या मुरळी, गोंधळी पोवाडा इत्यादी लोककलावंताना मानधन वाढविण्याबाबत

**(३४) ५९९७८ (२०-०४-२०२३). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात तमाशा, वाल्या मुरळी, गोंधळी पोवाडा इत्यादी लोककलावंत विविध लोककला सादर करतात परंतु या कलावंताना मानधन मात्र निम्मेच मिळत असल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या लोककलावंताचे मानधन वाढविण्यात येवून त्यांना संपूर्ण मानधन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२८-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.
शासन निर्णय क्र.वृकमा २०१२/प्र.क्र.११७/ सां.का.४, दि.०७.०२.२०१४ अन्वये राबविण्यात येते. शासन निर्णय क्र.पुरक/६९१९/प्र.क्र.८३/ सां.का.४, दि. ०९.०९.२०१९ अन्वये कलावंताचा इष्टांक १०० करण्यात आला असून अ,ब,क या वर्गवारीनुसार अनुक्रमे रुपये ३,१५०/-, २,७००/- आणि २,२५०/- असे मानधन प्रतिमहा थेट कलावंताच्या खात्यात संपूर्ण मानधन दिले जाते.
(२) राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजनेमध्ये सुधारणा करण्याचे प्रस्तावित असून याबाबत शासन सकारात्मक आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अमरावती जिल्ह्यात कृषी सेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३५) ५९९८६ (२१-०४-२०२३). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी व सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासह कृषी विकासाच्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कृषी सेवकांची रिक्त पदे भरण्याबाबत नितांत आवश्यकता असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्यात कृषी सहाय्यकांची १७०० हून अधिक पदे रिक्त असल्याचेही माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी आढावा बैठकीत कृषी विभागातील रिक्त पदांबाबत शासन सकारात्मक असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी कृषी विभागातील रिक्त पदांमुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागू नये यानुषंगाने रिक्त पदांची भरती कधीपर्यंत करण्यात येणार असून शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, यासंदर्भात शेतकरी कुटूंबाना आर्थिक स्थैर्य कसे मिळेल व जुन्या निकषांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे तसेच शासनाकडे याबाबत निवेदन व मागणी करण्यात येऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येत नसल्याने व कृषी सेवकांची पदेही भरण्यात येत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असून यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३०-०६-२०२३) :**(१) व (२) कृषि सहाय्यकांची रिक्त पदे सुरुवातीस तीन वर्षाकरीता कृषिसेवक म्हणून निश्चित वेतनावर भरण्यात येतात.

अमरावती जिल्हयात कृषि सहाय्यकांची ४४५ एकूण मंजूर पदे असून त्यापैकी ३४१ पदे भरलेली व १०४ पदे रिक्त आहेत. सद्यस्थितीत कृषि विभागांतर्गत कृषि सहाय्यकांची एकूण ११५९९ मंजूर पदे असून यापैकी ९३३९ पदे भरलेली व २२६० पदे रिक्त आहेत. तसेच सरळसेवेच्या कोट्यात कृषि सहाय्यकांची १०४३९ पदे मंजूर असून ८४६४ पदे भरलेली व १९७५ पदे रिक्त आहेत.

(३), (४) व (५) करीता कृषि विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत शासन सकारात्मक असून कृषि विभागातील रिक्त पदे भरण्याकरीता (सरळसेवा व पदोन्नती कोटा) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग स्तरावर तसेच विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर कार्यवाही कार्यान्वित आहे. त्यानुसार महाराष्ट्र कृषि सेवा गट-अ, संवर्गामध्ये ९२, महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब, संवर्गामध्ये १७४ आणि महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब(कनिष्ठ) संवर्गामध्ये ३१८ अधिकाऱ्यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा [गट-अ, गट-ब आणि गट-ब(कनिष्ठ)] संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता कृषि सेवा परीक्षा-२०२१ करिता एकूण २०३ आणि कृषि सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा संवर्गाचे सन २०२१ करीता एकूण २४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून या पदांकरीता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यासाठी विचार करण्यात येईल.

मर्यादित विभागीय परीक्षेच्या कोट्यातील कृषि पर्यवेक्षकांची ७५९ पदे कृषि सहाय्यकांमधून भरण्याकरीता दि.०२.०४.२०२३ रोजी परीक्षा पार पडलेली असून सदर परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना कृषि पर्यवेक्षक पदावर पदस्थापना देण्याची कार्यवाही संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर सुरु आहे.त्याचप्रमाणे वित्त विभाग, शासन निर्णय, दि.३१.१०.२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील (वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील पदे वगळून) सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. त्यानुसार कृषि विभागातील लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता एकूण ३७९ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दि.२०.०१.२०२३ रोजी विज्ञापीत करण्यात आली आहे. तसेच लिपिक वर्गीय संवर्गातील उर्वरीत २१८ पदांकरीता जाहिरात दि.०५.०४.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सा.प्र.वि., शासन निर्णय दि.०१.०२.२०२३ अन्वये अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) पदे निश्चित करण्याचे निकष बदलण्यात आलेले आहेत. त्यानुसार कृषि सहाय्यक संवर्गाची सुधारीत बिंदूनामावली प्रमाणित करुन घ्यावयाची कार्यवाही संबंधित विभागीय कृषि सहसंचालक यांचेस्तरावर सुरु आहे. सुधारीत बिंदूनामावली प्रमाणित झाल्यानंतर कृषि सहाय्यक पदभरतीची पुढील नियमोचित कार्यवाही प्राथम्यक्रमाने करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रावेर (जि.जळगांव) येथे कृषी विभागातील ६० टक्क्याहून अधिक पदे रिक्त असल्याबाबत**

**(३६) ६०६०६ (२१-०४-२०२३). श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगांव) येथे कृषी विभागातील ६० टक्क्याहून अधिक पदे रिक्त असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) उक्त जिल्ह्यात केळी व कापूस ही पिके प्रसिध्द असून मागील काही महिन्यात केळी पिकांवर अनेक रोगांचा प्रादुर्भाव होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी होण्याकरिता कृषी विभागातील कर्मचारी संख्या पूर्ण असणे आवश्यक असताना कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने शेतकऱ्यांना आवश्यकते सहाय्य मिळत नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३०-०६-२०२३) :**(१) अंशत: खरे आहे.

तालुका कृषि अधिकारी रावेर, जि. जळगाव कार्यालयामध्ये एकूण ६७ पदे मंजुर असून सद्य:स्थितीत यापैकी २६ पदे भरलेली व ४१ पदे रिक्त आहेत. यापैकी तांत्रिक संवर्गाची ४९ पदे मंजूर असून २१ पदे भरलेली व २८ पदे रिक्त आहेत.

(२) होय खरे आहे.

सन २०२२-२३ मध्ये जळगाव जिल्ह्यात एकूण ५२,४५४ हेक्टर क्षेत्रावर केळीची लागवड झालेली आहे. केळी पिकावरील कुकुंबर मोसॅक विषाणू (सी.एम.व्ही.) हा प्रमुख विषाणूजन्य रोग असून सन २०२२-२३ मध्ये केळी पिकावर या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आहे.

(३) शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध शासकीय योजना कृषि सेवेतील (तांत्रिक संवर्गातील) अधिकारी/कर्मचारी (तालुका कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी, कृषि पर्यवेक्षक आणि कृषि सहाय्यक) यांचेमार्फत राबविण्यात येतात. उक्त रिक्त असणाऱ्या पदांचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे देवून कृषि विभागाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच शेतकऱ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची काळजी घेण्यात येत आहे.

(४) महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील कृषि अधिकारी/मंडल कृषि अधिकारी या पदांवर दि.१८.११.२०२२ च्या आदेशान्वये पदोन्नतीने १० अधिकाऱ्यांना जळगाव जिल्ह्यात पदस्थापना दिलेली आहे.

महाराष्ट्र कृषि सेवा संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदे भरण्याकरीता कृषि सेवा परीक्षा-२०२१ करिता एकूण २०३ आणि कृषि सेवा परीक्षा २०२२ करीता २१४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र कृषि प्रशासकीय सेवा संवर्गाचे सन २०२१ करीता एकूण २४ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. या पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षेची कार्यवाही कार्यान्वित आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून या पदांकरीता उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यानंतर जळगाव जिल्ह्यातील रिक्त पदे प्राथम्यक्रमाने भरण्यासाठी विचार करण्यात येईल.

मर्यादित विभागीय परीक्षेच्या कोट्यातील कृषि पर्यवेक्षकांची पदे कृषि सहाय्यकांमधून भरण्याकरीता दि.०२.०४.२०२३ रोजी परीक्षा पार पडलेली असून सदर परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे निवड झालेल्या उमेदवारांना कृषि पर्यवेक्षक पदावर पदस्थापना देण्याची कार्यवाही संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक स्तरावर सुरु आहे. त्याचप्रमाणे वित्त विभाग, शासन निर्णय, दि.३१.१०.२०२२ अन्वये ज्या विभागांचा सुधारीत आकृतिबंध अंतिम झालेला नाही, अशा विभागांना गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील (वाहनचालक आणि गट-ड संवर्गातील पदे वगळून)

सरळसेवेच्या कोट्यातील ८० टक्के रिक्त पदे भरण्यास मुभा देण्यात आली आहे. त्यानुसार नाशिक विभागातील गट-क संवर्गातील लिपिक-टंकलेखक संवर्गाकरीता एकूण ५५ पदांची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दि.२०.०१.२०२३ रोजी विज्ञापीत करण्यात आली आहे. तसेच नाशिक विभागातील सहाय्यक अधिक्षक एकूण ०६ पदे व वरिष्ठ लिपिक एकूण १२ पदांची जाहिरात दि.०५.०४.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. कृषि विभागाचा सुधारीत आकृतीबंध अंतिम झालेला नसल्यामुळे वित्त विभाग, शा.नि. दि.३१.१०.२०२२ मधील तरतूदीनुसार कृषि विभागातील सरळसेवेच्या कोट्यातील उर्वरीत रिक्त पदांची भरती प्रक्रीया राबविण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खेळे / नमन व जाखडी या लोककला प्रकारांना अनुदान मिळण्याबाबत**

**(३७) ६०९१३ (२०-०४-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.अतुल बेनके (जुन्नर), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यामध्ये लोककला अभिजात संस्कृतीचे दर्शन अखिल जगाला घडवितात त्या कला संपुष्टात येऊ नये म्हणून बदलत्या काळाशी स्पर्धा करत त्यांना तग धरता यावा यासाठी शासन निर्णय क्रमांक लोक. अ. २००७/ प्र.क्र.१२७/ सां.कां.३, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०००३२, दि. ०१/०१/२००८ नुसार शासनाने अनुदान पॅकेज जाहीर करुन राज्यातील सांस्कृतिक व पारंपारीक कलेची लोकांना माहिती व्हावी तसेच त्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी राज्यात नाट्यसंगीत, नाट्य, चित्रपट, तमाशा, फड, हंगामी तमाशा फड, लावणी कलापथक, दशावतार मंडळ, खडीगंमत कलापथक व शाहिरी पथके इत्यादिना अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मध्य कोकणातील खेळे / नमन व जाखडी या कलाप्रकारांना अनुदानाचा लाभ मिळत नाही.तसेच कोकणामध्ये प्रसिध्द असून अनेक वर्ष या कलाप्रकाराच्या माध्यमातून अनेक कलावंत आपली कला प्रदर्शित करुन मनोरंजन व प्रबोधन करण्याचे काम करत असूनही या कलाप्रकारांना अनुदान / कलाकार पेन्शन योजना शासनाकडून दिली जात नाही, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, उक्त अभिजात कोकणी कलाप्रकार काळाच्या ओघात लोप होण्याचा धोका संभवत असल्याने मध्य कोकणातील या पारंपारीक व सांस्कृतिक कलाप्रकारांना उर्जितावस्था देणे, त्या टिकवून ठेवण्याकरीता अनुदान आणि कलाकार पेन्शन योजना लागू करणे अत्यंत आवश्यक आहे,हे ही खरे आहे काय,,
(४) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेतली आहे काय,त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अशंत: खरे आहे.
खेळे/नमन व जाखडी यासाठी खास अनुदानाची योजना नाही. तथापि, शासनाच्या वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजना आणि संस्था अनुदान योजना अंतर्गत सर्व प्रयोगात्मक कलाप्रकारातील कलावंत/संस्था सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करु शकतो. सदर योजनेच्या पात्रता निकषानुसार पात्र ठरल्यास या योजनेचा लाभ मिळू शकतो.
(३) होय.
शासनाच्या वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजना आणि संस्था अनुदान योजना अंतर्गत सर्व प्रयोगात्मक कलाप्रकारातील कलावंत/संस्था सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करु शकतो. सदर योजनेच्या पात्रता निकषानुसार पात्र ठरल्यास या योजनेचा लाभ मिळू शकतो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर शहरातील ग्रामीण भागात बनावट दारु तयार होत असल्याबाबत.**

**(३८) ६१२१५ (०९-०५-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील ग्रामीण भागात बनावट दारु तयार होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील बनावट दारु बनविणाऱ्या संबंधिताना पोलिसांनी पकडले आहे काय,संबंधित आरोपीवर कारवाई करण्याबाबत तसेच बनावट दारु रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे आहे.

मुल-राजोली रोडवरील मे.ए.व्हि.जी. गोट फार्म, चितेगाव, ता.मुल, जि.चंद्रपूर या ठिकाणी दि.२५.१.२०२३ रोजी कारवाई करण्यात आली आहे.

(२) सदर ठिकाणी बनावट दारु तयार करण्याचा कारखाना राज्य उत्पादन शुल्क अधिका-यांनी उघडकीस आणलेला आहे.

या प्रकरणी दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुल, जि,चंद्रपूर यांनी संबंधितांविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ मधील कलम ६५, ८१, ८३, १०३ व भा.दं.वि. कलम ३२८ अंतर्गत गु.र.क्र.४/२०२३, दि.२५.१.२०२३ नोंदविला आहे. या गुन्ह्यात ३०८० लि. स्पिरीट, ब्लेन्ड ५०० लि. बुचे सिल करणारी मशिन, रिकाम्या बाटल्या, लेबल, इसेन्स, कागदी बॉक्स इ. रु.१६.५० लाख रकमेचे साहित्य व ६ वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या गुन्ह्यात अद्यापपर्यंत ६ आरोपींना अटक करण्यात आली असून १ महिला आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर झालेला आहे. या गुन्ह्याचा तपास निरीक्षक, विभागीय भरारी पथक, राज्य उत्पादन शुल्क, नागपूर यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे.

राज्य स्तरावर तक्रार स्वीकारण्यासाठी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात अहोरात्र नियंत्रण कक्ष कार्यरत आहे. अवैध मद्य निर्मिती/ वाहतूक/ विक्री करणा-यांविरुध्द पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत आवश्यकतेनुसार स्वतंत्र व एकत्रितपणे कारवाई करण्यात येते.

अवैध मद्य निर्मिती व विक्रीच्या धंद्याची माहिती मिळावी म्हणून खब-यांना बक्षीस देण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदीया आदी जिल्हयातील झाडीपट्टी रंगभूमी च्या कलाकारांबाबत**

**(३९) ६१२१६ (२०-०४-२०२३). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा व गोंदीया आदी जिल्हयात १०० हून अधिक झाडापट्टी रंगभूमी नाट्य कंपन्या अस्तित्वात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किमान १० हजाराच्या वर स्थानिक नाटय कलाकार या रंगभूमीशी निगडीत असूनही शासन दरबारी त्यांची दखल घेतली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, झाडीपट्टीच्या या उपेक्षित रंगभूमीला शासनामार्फत सांस्कृतिक कार्य वा संबंधित विभागाकडून शासनमान्य दर्जा देण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, झाडीपट्टीच्या रंगभूमीवरील कलाकारांसाठी शासन काही योजना आणणार आहे काय,
(५) असल्यास, एकंदरीतच विदर्भातील या महत्वाच्या व हळूहळू मागे पडत चालेल्या झाडीपट्टीच्या रंगभूमीला राज्यस्तर, देशपातळीवर घेण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०७-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.
झाडीपट्टी रंगभूमी नाट्य कंपन्या ह्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडे नोंदणी करत नसल्याने याबाबत पूर्ण माहिती उपलब्ध नाही. तथापि, अंदाजे ७० ते ८० इतक्या कंपन्या अस्तित्त्वात असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते.
(२) हे खरे नाही. शासनाच्या वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजना आणि संस्था अनुदान योजना अंतर्गत कोणताही कलाकार/संस्था सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करु शकतो. सदर योजनेच्या पात्रता निकषानुसार पात्र ठरल्यास या योजनेचा लाभ मिळू शकतो.
(३) प्रश्न उद्भवत नाही. असा कोणताही दर्जा कोणत्याही कलाप्रकराला/संस्थेला सांस्कृतिक कार्य संचालनालय वा या विभागाकडून देण्यात येत नाही.
(४) सध्या अस्तित्वात असलेल्या शासनाच्या वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन योजना आणि संस्था अनुदान योजना अंतर्गत कोणताही कलाकार/संस्था सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करु शकतो. सदर योजनेच्या पात्रता निकषानुसार पात्र ठरल्यास या योजनेचा लाभ मिळू शकतो.
(५) सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत झाडीपट्टी नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात येऊन या कलेचे जतन व संवर्धन करण्यात येत असते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजळगांव जिल्ह्यातील चोपडा येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय तसेच कर्मचारी निवासस्थान व मुद्देमाल ठेवण्यासाठी गोडाऊन बांधण्याबाबत**

**(४०) ६२४२९ (०९-०५-२०२३). श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील चोपडा येथे असलेले राज्य उत्पादन शुल्काचे कार्यालय सद्यःस्थितीत भाडयाच्या जागेवर कार्यरत असून सदर जागा कार्यालयीन कामकाजासाठी अपुरी पडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शहरातील सिटी सर्व्हे नं.२५७९ मध्ये २७६९.२ चौ.मि. क्षेत्रफळ हे दुय्यम निरिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चोपडा यांच्या नावे असून सदर जागेवर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कार्यालय तसेच कर्मचारी निवासस्थान व मुद्देमाल ठेवण्यासाठी गोडाऊन बांधण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंभूराज देसाई (२०-०६-२०२३) :**(१) दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चोपडा या कार्यालयाची जागा ही विभागाच्या मालकीची असून, जागेचा सी सी नंबर २५४९ असून, जागेचे क्षेत्रफळ २७६९.२ चौ.मी. आहे. सदर बांधकाम जीर्ण झाल्याने १९९७-९८ ते जानेवारी, २०२१ अखेर कृर्षी उत्पन्न बाजार समिती, चोपडा येथे भाडयाच्या जागेत कार्यरत होते. सद्यस्थितीत सदर कार्यालय, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, जळगाव कार्यालयाच्या इमारतीमध्ये कार्यरत आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) शासन निर्णय, दि.२४.०४.२०२३ अन्वये, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क चोपडा, जि.जळगाव या कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारत, कर्मचारी निवासस्थान बांधकाम करण्यासाठी रु.४.५८ कोटी इतक्या रकमेच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्याबाबत

**(४१) ६२४८२ (१९-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सहकारी व खाजगी साखर कारखान्याचा गळीत हंगामासाठी मोठ्या संख्येने ऊसतोड कामगार इतर भागातून येत असून ऊसतोड कामगारांच्या मुलभूत गरजांकडे कारखाना प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक भागात शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे कामगारांना मोकळया जागेत शौचालयाला जावे लागत असल्यामुळे गावात रोगराई पसरत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन ऊसतोड कामगारांच्या मुलभूत गरजा भागविण्यासाठी संबंधित कारखान्यास जबाबदारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (१६-०६-२०२३) :**(१) व (२) ऊस वाहतूक करणारे कंत्राटदार ऊसतोड मजूर मुकादमाबरोबर मजूर पुरविणेबाबत व ऊसतोडणीबाबत करार करतात.

कारखान्यावर मजूर आल्यानंतर कारखान्याकडून या मजूरांना राहण्याकरीता तात्पूरती व्यवस्था म्हणून चिवे, बांबू, तट्टे इ.बाबी पूरविल्या जातात.

काही कारखान्यात ऊसतोड मजूरांच्या वास्तव्याच्या कायमस्वरूपी सुविधा आहेत. गाळप हंगामात कारखाना परिसरात वास्तव्यास येणाऱ्या

ऊसतोड कामगारांकरीता महिला कामगारांकरीता व विशेषत: बालकांकरीता स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे व इतर प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

तसेच ज्या ठिकाणी कायमस्वरूपी स्वच्छतागृह बांधणे शक्य नसेल त्या ठिकाणी तात्पूरत्या स्वरूपाची स्वच्छतागृहांची / फिरत्या स्वच्छतागृहांची व्यवस्था करावी व ऊसतोडणी मजूरांसाठी प्राथमिक सुविधा, सुरक्षा व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत दि.२३/०७/२०१९ रोजीच्या साखर आयुक्त यांच्या परिपत्रकाव्दारे राज्यातील सर्व सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना सूचना दिलेल्या आहेत. याशिवाय दरवर्षी गाळप हंगाम सुरू होणेपूर्वी कारखान्यांना अशा सुविधा पुरविणेबाबतच्या सूचना साखर आयुक्त यांच्या मार्फत दिल्या जातात.

(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना केली असून या महामंडळामार्फत ऊस तोडणी मजुरांचा विमा उतरविणे त्यांचे पाल्यांच्या शेक्षणिक सुविधेसाठी वसतिगृहे उभारणे, ऊसतोड मजूरांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देणे आदी विविध कल्याणकारी योजना राबविणे बाबत कार्यवाही करण्यात येते. गाळप हंगाम सन २०२१-२२ मध्ये झालेल्या गाळपावर साखर कारखान्यांकडून या महामंडळास रू.३९१९.५४ लाख रक्कम ऊसतोड कामगार कल्याण निधी पोटी अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयातून जाणाऱ्या समृध्दी महामार्गामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी सर्विस रोडचे बांधकाम करण्याबाबत**

**(४२) ६२७७१ (२५-०४-२०२३). ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातून जात असलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी दोन्ही बाजूनी कंपाऊंड वॉल असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी सर्विस रोडची मागणी दिनांक २८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाममंत्री यांचेकडे केल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समृध्दी महामार्गामुळे नैसर्गिक जलस्त्रोत बंद झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचून राहत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सर्विस रोड बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-०६-२०२३) :** (१) नाही.

तथापि, नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुक्यातील पॅकेज-१२ मधील निविदा प्रमाणे मंजूर लांबीचे सर्व्हिसरोडचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच इगतपूरी तालुक्यातील पॅकेज-१३ मधील निविदाप्रमाणे मंजूर लांबीचे सर्व्हिसरोडचे काम प्रगतीपथावर आहे.

तसेच, नाशिक जिल्हयातील समृध्दी महामार्गाच्या पॅकेज क्रमांक १२ व पॅकेज क्रमांक १३ मध्ये स्थानिकांच्या मागणीनुसार अतिरिक्त सर्व्हिस रोडच्या कामास मंजूरी देण्यात आलेली आहे व सदर अतिरिक्त सर्व्हिस रोड तयार करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(२) सदर बाब निदर्शनास आलेली नाही. तथापि, अशी बाब निदर्शनास येताच याबाबत योग्य ती खबरदारी घेऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी नगरपंचायत हद्दीतील सर्वे नंबर २७५/१ मध्ये ग्रीन कॉलनी परिसरात अवैध देशी दारूचे दुकान बंद करण्याबाबत**

**(४३) ६२९६७ (१९-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी नगरपंचायत हद्दीतील सर्वे नंबर २७५/१ मध्ये ग्रीन कॉलनी परिसरात अवैध देशी दारूचे दुकान सुरू आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंडळ अधिकारी व तलाठी यांच्या संगनमताने खोटा बनावट सातबारा हस्तलिखित बनवून सदर जागेवर अवैध बांधकाम करण्यात आले आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक प्रशासनाकडे वारंवार तक्रारी दाखल करूनही तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई (२०-०६-२०२३) :** (१) हे खरे नाही.

या ठिकाणी सन २०१८ मध्ये एक देशी मद्यविक्री अनुज्ञप्ती शासन मान्यतेने स्थलांतरीत होऊन सद्यःस्थितीत कार्यरत आहे.

(२) हे खरे नाही.

सदर अनुज्ञप्ती स्थलांतर प्रकरणी प्रस्तावित जागेचा नमूना ८ तसेच, ग्रामपंचायत बार्शीटाकळी यांचा दि.२५.२.२०१५ चा बांधकाम अधिकृत असल्याचा दाखला व नगरपंचायत बार्शीटाकळी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर केले होते.

(३) व (४) हे खरे नाही.

या प्रकरणी यापूर्वी देखील तक्रारी दाखल झाल्या होत्या. मात्र तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, सर्व आवश्यक कागदपत्रे नगरपंचायत बार्शीटाकळी यांचेकडूनच देण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच, या प्रकरणी दाखल अपील क्र.२०७/२०१८ मध्ये तत्कालीन आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई यांचे समक्ष सुनावणी होऊन दि.१३.१.२०२० च्या आदेशान्वये अपील निकाली काढण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात खाजगी सावकारी सुरु असल्याबाबत

**(४४) ६३०८९ (२१-०४-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात खाजगी सावकारी सुरु असून सावकारांनी दामदुप्प्ट व्याज लावून अनेकांची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक यांनी जुनोना चौक बाबुपेठ येथील रहिवासी गजराज ठाकूर यांच्या घरावर धाड टाकली असता मोठ्या प्रमाणात स्टॅम्प (STAMP), कोरे धनादेश, रेव्हन्यु तिकिट व दोन रजिस्टर जप्त केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यात विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात खाजगी सावकारी सुरु असून सामान्य मध्यमवर्गीयांची फसवणूक केल्यामुळे त्यांना अनेक अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०२-०६-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे

चंद्रपुर जिल्हयामध्ये एकुण १६ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी ६ तक्रारीमध्ये कारवाई करून संबंधीतांनी १४.०२ हेक्टर जमीन परत करण्यात आली आहे व ६ दोषींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.उर्वरित १० तक्रारींपैकी ६ तक्रारी तथ्थहीन असून ४ तक्रारींवर चौकशी सूरू आहे.

(२) अवैध सावकारीच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीनुसार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सावली, यांनी दि. १२/१/२०२३ रोजी श्री ठाकूर यांच्या घरावर धाड टाकली. सदर धाडीमध्ये ९८ स्टॅम्प पेपर (लिहिलेले व कोरे), ११२-कोरे धनादेश, ६-रेव्हेन्यु तिकीट लावलेल्या पावत्या, ४-रकमेच्या नोंदी असलेले रजिस्टर, १०-बँक पासबुक,तसेच मतदान कार्ड/पॅन कार्ड/आधार कार्ड व इतर विक्रीपत्र, मालमत्ता पत्र इतर आक्षेपार्ह कागदपत्रे आढळून आली असून पुढील चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(३) व (४) अवैध सावकारीबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने चौकशी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. सदर कायदयाची अंमलबजावणी योग्य रितीने होण्यासाठी व अनधिकृत सावकारी करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षते खाली दिनांक ०१ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्व्ये समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीमार्फत अवैध सावकारी विरुध्द करण्यात येत असलेल्या कारवाईचा नियमितपणे आढावा घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लोहोणेर (जि.नाशिक) येथील ग्रामपंचायत इमारतीच्याजवळ बांधलेल्या कृषी पर्यवेक्षक निवासस्थानाची दूरवस्था झाल्याबाबत

**(४५) ६३०९४ (२१-०४-२०२३). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहोणेर (जि.नाशिक) येथील ग्रामपंचायतीने शासनाच्या विविध प्रकारच्या योजनांचा लाभ होऊन शेतकरी बांधवाच्या सोयीसाठी कृषी कर्मचारी राहावे म्हणून निवासस्थानी ग्रामपंचायत इमारतीजवळील बांधलेल्या कृषी पर्यवेक्षक निवासस्थानाची अत्यंत दूरवस्था होऊन ते कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जवळच्या अंगणवाडीमधील बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मागील आठ-दहा वर्षांपासून बंद असलेले कृषी पर्यवेक्षक निवासस्थान निर्लेखित करुन पाडण्याकरिता तसेच या ठिकाणी ग्रामविकास अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता नवीन निवासस्थान बांधण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांच्यावतीने करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीनुसार निवासस्थान निर्लेखित करुन नवीन निवासस्थान बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (३०-०६-२०२३) :**(१) हे खरे आहे.

दि.०९.०१.२०२३ रोजीच्या दैनिक लोकमत या स्थानिक वर्तमानपत्रात लोहोणेर गावातील कृषि पर्यवेक्षकांचे निवासस्थान मोडकळीस आल्याने त्याचे निर्लेखन करणेबाबतची बातमी आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

कृषि पर्यवेक्षकांचे सदर निवासस्थान निर्लेखित करुन पाडण्याकरीता लोहोणेर येथील ग्रामस्थांकडून कोणतेही निवेदन तालुका कृषि अधिकारी, देवळा यांना प्राप्त झालेले नाही.

(३) तालुका कृषि अधिकारी, देवळा यांनी उप अभियंता, बांधकाम विभाग, पंचायत समिती, देवळा, जि.नाशिक यांना निवासस्थान तथा कार्यालयाचे दुरुस्तीचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत सूचित केलेले आहे. दुरुस्तीचे अंदाजपत्रक प्राप्त होताच सदर मुख्यालय विहीत मार्गे दुरुस्त करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कृषी विभाग, जिल्हा परिषद अमरावती अधिनस्थ वर्ग-२ ची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४६) ६३१४६ (२१-०४-२०२३). श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, आयुक्त कृषी, कृषी आयुक्तालय पुणे तसेच मा.कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १९ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्यामध्ये कृषी विभाग, जिल्हा परिषद अमरावती, अधिनस्त कृषी अधिकारी, जिल्हा परिषद गट-ब या संवर्गाची एकूण २७ पदे मंजूर असून आठ पदे रिक्त असल्याने कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्यात यावी जेणेकरुन कृषी विभागाच्या शेतकऱ्यांना न्याय द्यावा या संबंधाने कृषी आयुक्त, पुणे यांना दिनांक ९ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास अमरावती कृषि अधिकारी यांचेकडून मागणी मंजुर करण्याबाबत पत्र पाठविले असून सदर मागणी पत्रावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार (०४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.

कृषि विभाग, जिल्हा परिषद, अमरावती यांचे अधिनस्त कृषि अधिकारी (जिल्हा परिषद) गट-ब (कनिष्ठ) (राजपत्रित) या संवर्गाची एकूण २७ पदे मंजूर असून त्यापैकी १९ पदे भरलेली आहेत.

रिक्त असलेल्या ८ पदांचा अतिरिक्त पदभार अन्य अधिकाऱ्यांवर सोपविण्यात येऊन कृषि योजनाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
(३) जिल्हा परिषद अमरावती अधिनस्त महाराष्ट्र कृषि सेवा, गट-ब संवर्गातील रिक्त पदे पदोन्नती/ सरळसेवेने भरण्यासाठी प्राथम्यक्रमांने विचार करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यात डोंगरात पेटणा-या वणव्याविरोधी कायदा असतानाही सक्षमपणे राबविला जात नसल्याबाबत**

**(४७) ६३१५६ (२१-०४-२०२३). श्री.भरतशेठ गोगावले (महाड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यात डोंगरातील वणव्यांमुळे येथील अनेक उपयुक्त वृक्षवेली तसेच वनहद्दीत उन्हाळयात वणवा लागल्याने वनौषधी, विविध फळझाडे, सरपटणारे प्राणी, कीटक, तृणभक्षी प्राणी व त्यांची अंडी घरट्यांसह जळून नष्ट होत असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील वर्षापासून वणव्याचे प्रमाण वाढत असून मानवनिर्मित वणवा लावल्याने जंगलसंपत्ती तसेच त्याभागात असलेल्या आदिवासी वाड्या व वस्त्यांमध्ये असलेल्या झोपड्यांचेही नुकसान होत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वणव्यामुळे पशुपक्ष्यांचा अधिवास देखील धोक्यात आले असून वनसंपदेचे संवर्धन करण्याकरीता तसेच वन्यजीवांना धोका पोहचू नये याकरीता वनहद्दीवर जाळरेषा काढण्याची आवश्यकता असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच कोकरे, तेटघर, राजेवाडी (ता.महाड) येथे लावण्यात आलेल्या वणव्यामुळे जंगलाची मोठी हानी झाली असून, पोलादपूर तालुक्यातील बोरज फाट्याजवळ वणव्यात कलमी झाडे जळाली व गुरांचा गोठा जळल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन वणव्याविरोधी कायदा असतानाही तो सक्षमपणे राबविला जात नसल्याबाबत तसेच मानवनिर्मित वणव्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-०६-२०२३) :** (१) बहुतांश वणवे हे मालकी क्षेत्रात लागत असल्याने गवत व पालापाचोळा जळाल्याचे दिसून येते. पोलादपूर तालुक्यामधील वनक्षेत्रात सन २०२१ ते फेब्रुवारी २०२३ अखेर एकूण ४ हे. क्षेत्र जळाल्याचे आढळून आले आहे.
(२) बहुतांश वणवे हे मालकी क्षेत्रातील आहेत. मागील वर्षी फक्त चरई, ता. पोलादपूर येथे एका ठिकाणी वन हद्दीत वणवा लागल्याने ३ हे. वनक्षेत्र जळाल्याचे आढळून आले होते. त्यामध्ये आदिवासी पाडा व झोपडयांना लागलेल्या वणव्यामुळे नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) वनहद्दीत वणवा लागु नये म्हणून वनविभागाकडून वनक्षेत्राच्या सभोवती आग प्रतिबंधक जाळरेषा काढली जाते.
(४) मौजे कोकरे, तेटघर येथे शासकीय वन नाही. राजेवाडी येथे मालकी क्षेत्रात वणवा लागल्याचे दिसून आले होते. तसेच बोरज फाटयाजवळ बोरज परिसरात बोरज, साखर, उमरट व पिंतळवाडी हि गावे असून सदर गावात वनक्षेत्र नाही.

(५) वनक्षेत्रामध्ये वणवा लागल्यानंतर वनकर्मचाऱ्यांच्या मार्फत विझवला जातो. तसेच वनवणव्यांच्या घटनेबाबत भारतीय वन अधिनियम १९२७ अन्वये गुन्हा नोंद केला जातो.

वनवणवे लागु नयेत म्हणून पुढिल प्रमाणे उपाय योजना करण्यात येतात:-

१. वनक्षेत्रात वनवणवा लागु नये याकरिता वनविभागातर्फे दरवर्षी आग प्रतिबंधात्मक जाळरेषा घेण्यात येतात.

२. वनक्षेत्रातील आग विझविण्यासाठी प्रशिक्षीत अधिकारी /कर्मचारी वनमजूर यांचे फायर फायटींग पथक तयार करण्यात येते व त्यांना आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करुन देण्यात येते.

३. परिक्षेत्र,विभाग व वृत्तस्तरावर क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांची कार्यशाळा आयोजित करुन वनवणवा आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येते.

४. आगीवर नियंत्रण आणण्याच्या दृष्टीने संयुक्त वन व्यवस्थापन समिती/वन संरक्षण समित्यांना सक्रियरित्या सहभागी करण्यात येते. वनवणवा प्रतिबंध सप्ताह १ ते ७ फेब्रुवारी दरम्यान साजरा करण्यात येतो व गावपातळीवर ग्रामस्थांचा बैठकी घेणे, बॅनर –पोस्टर लावणे, सायकल रॅली काढणे इत्यादी उपक्रम घेवून लोकांमध्ये जाणीव-जागृती करण्यात येते.

५. अभयारण्यातील व अभयारण्याबाहेरील गावात वनवणवा बाबत कार्यशाळा घेतल्या जातात व वनांचे नुकसान होऊ नये याबाबत करावयाच्या विविध उपाय योजनांबाबत मार्गदर्शन केले जाते.

६. वन-वन्यजीव प्रेमी यांचे व्हाट्सअप ग्रुप तयार करण्यात आले असून त्यांचे कडूनही वनवणवा लागल्याचे माहिती मिळताच त्याप्रमाणे वनवणवा विझविण्याची कार्यवाही करण्यात येते.

७. जंगलामध्ये आग लागल्याची माहीती SMS व्दारे तात्काळ प्राप्त करण्यासाठी विभागीय स्तरावरील व क्षेत्रीय स्तरावर अधिकारी/कर्मचारी तसेच NGOसंयुक्त वन व्यवस्थापन समिती सदस्य, अग्निरक्षक, वनपेमी ग्रामस्थ यांचे फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात येते.

८. आगीपासुन वनांचे संरक्षण करणेकरीता विभागीय स्तरावर वनवणवा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले असुन सहाय्यक वनसंरक्षक यांना केंद्रस्थ अधिकारी म्हणून नियुक्ती करुन तसेच क्षेत्रीय स्तरावर वनपरिक्षेत्र अधिकारी यांना केंद्रस्थ अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येते.

९. आग नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत असते तसेच जंगलात कोठेही आग लागल्यास अंक्षाश रेखांशसह फोटो व बिनतारी संदेशाव्दारे, व्हॉट्सॲप ग्रुप मध्ये व संबधीत परिक्षेत्राला तात्काळ कळविण्यात येतात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभाग स्तरावरुन प्राप्त करुन घेतला जातो.

१०. मेळघाट सारख्या व इतर दुर्गम भागात आगीच्या ठिकाणी जलद गतीने क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना पोहचण्यासाठी चारचाकी वाहनांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच वनवणवा हंगामात निरिक्षण, मनोरे, बिनतारी संदेश केंद्र यांचेवर २४ तास कर्मचारी निगराणी करतात.

११. जनजागृती आणि लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी गावा-गावात अंगार मुक्त योजना राबविण्यात येते व अंगार मुक्त गावाकरीता रोखीने बक्षिस देण्यात येते.

१२. वन्दे मातरम् टोल फ्री Helpline सेवा-लोकांकडून वन विभागातील अवैध घटनांची माहिती/तक्रार प्राप्त होण्यासाठी टोल फ्री क्र. "११२६" वर कार्यान्वीत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## (जि.नांदेड, ता. देगलूर) येथे इतर मागास प्रवर्गातील मॅट्रिक उत्तर शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींसाठी वसतीगृह निर्माण करण्याबाबत

**(४८) ६३४१२ (२१-०४-२०२३). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.अजित पवार (बारामती), श्री.धनंजय मुंडे (परळी), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी मुलांसाठी आणि मुलींसाठी प्रत्येकी एक अशी ७२ शासकीय वसतीगृह सुरु करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच नांदेड जिल्ह्यातील अति मागास असलेल्या, कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्राच्या बॉर्डरवर असलेल्या देगलूर तालुक्यात इतर मागास प्रवर्गातील मॅट्रिकोत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी व मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) त्याचप्रमाणे इतर मागास वर्ग, विजा (अ), भज (ब), भज (क), भज (ड) व वि.मा.प्र. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी जिल्ह्याच्या ठिकाणी प्रस्तावित असलेले वसतिगृह स्वयंसेवी संस्थांऐवजी शासनामार्फत चालविण्याची लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.इतर मागास बहुजन कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात देगलूरसह इतर मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांसाठी व मुलींसाठी वसतिगृह उभारण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे (०४-०७-२०२३) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने स्वत: इमारत भाडयाने घेवून जिल्हानिहाय वसतीगृहे कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय दि.28.02.2023 अन्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रत्नागिरी जिल्ह्यातील जेष्ठ कलावंतांचे प्रलंबित मानधन तातडीने मिळण्याबाबत**

**(४९) ६३६२९ (२१-०४-२०२३). श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.यशवंत माने (मोहोळ), श्री.राजेश नरसिंगराव पाटील (चंदगड), कुमारी आदिती तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विविध भागात अनेक कलावंत आपल्या विविध कलेने मनोरंजन करीत असून सामाजिक बांधिलकी जोपासत आहेत व ज्ञान प्रबोधनाचे कार्य करतात त्यांना शासनाकडून कलावंत मानधन दिले जाते,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रत्नागिरी जिल्ह्यातील साधारणतपणे ४१७ नवीन वृध्द जेष्ठ कलावंतांचा मानधनाचा प्रस्ताव समाजकल्याण विभागाकडे प्रलंबित असून मानधन समितीची नेमणूक न झाल्याने हे लाभार्थी या योजनेपासून वंचित राहिले असल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील जेष्ठ कलावंतांना प्रलंबित मानधन मिळावे व जिल्हा मानधन समितीची तातडीने नेमणूक होऊन प्रलंबित प्रश्न सुटावा म्हणून स्थानिक लोकप्रतिनीधी व कलाकार संघटनांकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जेष्ठ कलावंताना मानधन मिळण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०४-०७-२०२३) :** (१) होय, हे खरं आहे.
(२) होय, हे खरं आहे.
(३) होय, हे खरं आहे.
(४) दिनांक १७ फेब्रुवारी, २०२३ रोजी रत्नागिरी जिल्हास्तरीय वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन समिती स्थापन करण्यात आली. दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३, ९ व १० मार्च, २०२३ आणि ११ एप्रिल, २०२३ रोजी प्रस्तावांची छाननीसाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार, सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या वित्तिय वर्षातील एकूण प्राप्त ४७७ अर्जांपैकी शासन निर्णय दि.७ फेब्रुवारी, २०१४ च्या अटी व शर्तीनुसार १८१ पात्र परिपूर्ण

अर्जांस जिल्हास्तरीय वृध्द साहित्यिक व कलाकार मानधन समितीने मंजूरी प्रदान केली आहे. सदर १८१ कलावंतांची यादी दिनांक ३ मे, २०२३ रोजी संचालनालयास ई-मेल द्वारे प्राप्त झाली असून मानधन अदा करण्याची कार्यवाही संचालनालय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील गंगाखेड येथील नोंदणी व मुद्रांक विभाग दुय्यम निबंधक कार्यालयात बोगस नकाशा प्रमाणपत्र जोडून दुय्यम निबंधकाची दिशाभूल केल्याबाबत**

**(५०) ६४११६ (२१-०४-२०२३). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गंगाखेड (जि.परभणी) येथील नोंदणी व मुद्रांक विभाग दुय्यम निबंधक कार्यालयात बोगस नकाशा प्रमाणपत्र जोडून दुय्यम निबंधकाची दिशाभूल केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी निबंधक कार्यालयाकडुन १०४ जणांना नोटीस बजावून चौकशी करण्यात येऊन चार महिन्याचा कालावधी उलटून गेला तरीही अद्याप दोषी आढळून आलेल्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०२-०६-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. दुय्यम निबंधक कार्यालयाच्या स्तरावरील कार्यवाही पुर्ण करण्यात आली असून पोलीस तपास कार्यवाही चालू आहे.
(३) दुय्यम निबंधक गंगाखेड कार्यालयाने २० डिसेंबर, २०२२ रोजी पोलीस शहर, पोलीस स्टेशन गंगाखेड येथे तक्रार दाखल केली असून त्या अनुषंगाने गुन्हा दाखल करण्यासाठी दि. ०५ व ०६ एप्रिल २०२३ रोजी प्रत्यक्ष जबाब नोंदविण्यात आला असून FIR दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.